बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बीड | शनिवार दि.२८ जून २०२५ | वर्षे४थे | अंक२९९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# काँग्रेस सरकारने देशाच्या लोकशाहीला वेठीस धरले होते

### आणीबाणीच्या ५० व्या वर्धापनदिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हल्लाबोल

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

आज भारताच्या लोकशाही इतिहासातील सर्वात काळ्या अध्यायांपैकी एक असलेल्या आणीबाणीला पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. या काळात तत्कालीन काँग्रेस सरकारने लोकशाहीला वेठीस धरले होते, अशा शब्दांमध्ये आणीबाणीच्या ५० व्या वर्धापनदिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला.

भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी जाहीर केली होती. इंदिरा गांधी यांनी घेतलेल्या या निर्णयाला बुधवारी ५० वर्षे पूर्ण झाले. याच पार्श्वभूमीवर आणीबाणीच्या दिवसांची आठवण करून देत 'एक्स' पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लिहिले आहे की, 'आपल्या संविधानाच्या भावनेचे झालेले उल्लंघन कोणताही भारतीय कधीही विसरू शकत नाही. संसदेचा आवाज दाबण्यात आला आणि न्यायालयांना नियंत्रित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या दिवशी भारतीय संविधानातील मूल्यांना बाजूला ठेवण्यात आले, मूलभूत अधिकार हिरावून घेण्यात आले, प्रेस स्वातंत्र्य दडपण्यात आले. अनेक राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांना तुरुंगात टाकण्यात आले.

#### सोशल मीडियावर अनुभव शेअर करा

आणीबाणीच्या त्या काळ्या दिवसांची आठवण असलेल्या किंवा ज्यांच्या कुटुंबांनी त्या काळात त्रास सहन केला आहे, अशा सर्वांना मी सोशल मीडियावर त्यांचे अनुभव शेअर करण्याचे आवाहन करतो. यामुळे १९७५ ते १९७७ या लज्जास्पद काळाबद्दल तरुणांमध्ये जागरूकता निर्माण होईल. आपल्या संविधानात नमूद केलेल्या तत्त्वांना बळकटी देण्यासाठी आणि विकसित भारताचे आपले स्वप्न साकार करण्यासाठी आपण एकत्र काम करत आहोत. आपण प्रगतीच्या नवीन उंची गाठू व गरीब आणि वंचितांची स्वप्ने पूर्ण करू, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.



पुढे मोदी म्हणाले की, कोणताही भारतीय आणीबाणीचा काळ विसरू शकत नाही. ४२ वी घटनादुरुस्ती हे त्यांच्या कृतीचे प्रमुख उदाहरण आहे. गरीब, उपेक्षित आणि दलितांना विशेषतः लक्ष्य करण्यात आले होते. जेव्हा आणीबाणी लागू करण्यात आली, तेव्हा मी संघाचा एक तरुण प्रचारक होतो. आणीबाणीविरोधी चळवळीदरम्यान राजकीय क्षेत्रातील सर्व लोकांकडून मला खूप काही शिकायला मिळाले. ब्लूक्राफ्ट डिजिटल फाऊंडेशनने त्यातील काही अनुभव पुस्तकाच्या माध्यमातून लोकांसमोर मांडला आहे, याचा मला आनंद आहे. या पुस्तकाची प्रस्तावना माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांनी लिहिली आहे.

#### आदर्श जपणे हेच स्वातंत्र्यसैनिकांचे ध्येय

आणीबाणीविरुद्धच्या लढ्यात ठामपणे उभ्या राहिलेल्या प्रत्येक व्यक्तीला आम्ही सलाम करतो. हे लोक संपूर्ण भारतातून, प्रत्येक क्षेत्रातून, वेगवेगळ्या विचारसरणीतून आले होते. या सर्वांनी एकाच उद्देशाने एकत्र काम केले. भारताच्या लोकशाही संरचनेचे रक्षण करणे आणि ज्या आदर्शांसाठी आपल्या स्वातंत्र्यसैनिकांनी आपले जीवन समर्पित केले. हाच आदर्श जपण्याचे त्यांचे ध्येय होते. त्यांच्या या सामूहिक संघर्षामुळेच तत्कालीन काँग्रेस सरकारला लोकशाही पुनर्संचयित करावी लागली आणि नव्या निवडणुका घ्याव्या लागल्या, ज्यात त्यांचा दारुण पराभव झाला. आम्ही आपल्या संविधानातील तत्त्वे अधिक दृढ करण्यासाठी आणि विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी एकत्रितपणे काम करत आहोत. आम्ही प्रगतीची नवी शिखरे गाठू आणि गरीब व वंचितांची स्वप्ने पूर्ण करू, अशी ग्वाहीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली आहे.

## वेचक

### कुल्लूमध्ये ढगफुटी

**कुल्लु :** हिमाचल प्रदेशच्या कुल्लूमध्ये ढगफुटीसारखा पाऊस झाला आहे. अचानक मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसामुळे नद्यांना पूर आला आहे. पावसामुळे कुल्लूमधील सध्याची परिस्थिती खूपच भयावह दिसत आहे. कुल्लू जिल्हा मुख्यालयाला जोडणारा राष्ट्रीय महामार्ग औट-लुहरी-सैंज रस्ता वाहनांच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. बंजरमधील दोन कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी आलेले कृषी आणि पशुसंवर्धन मंत्री प्रा. चंद्र कुमार, तंत्रशिक्षण, व्यावसायिक आणि औद्योगिक प्रशिक्षण मंत्री राजेश धर्मानी हे दोन मंत्रीही अडकले आहेत.

### घुसखोरीचा डाव उधळला

**राजौरी :** दहशदवाद्यांचा घुसखोरी करण्याचा प्रयत्न लष्कराने उधळला आहे. केरी सेक्टरमधील बारात गाला परिसरात मंगळवारी सकाळी पाकिस्तानकडून घुसखोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका दहशतवाद्याला लष्कराने ठार केले. हे तीन ते चार दहशतवादी असल्याचे सांगण्यात येत आहे. सतर्क जवानांनी गोळीबार सुरू करताच इतर दहशतवादी परत पळून गेले.

# तब्बल ४१ वर्षांनी पडणार भारतीयांचे अंतराळात पाऊल

### शुभांशूसह चार अंतराळवीर अंतराळ स्थानकाकडे झेपावले

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला बुधवारी ॲक्सियम मिशन ४ अंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे रवाना झाले. त्यांच्यासोबत इतर तीन अंतराळवीरही अंतराळ स्थानकाकडे जाणार आहेत. शुभांशू शुक्ला हे या मोहिमेचे पायलट आहेत. भारतीय वेळेनुसार दुपारी १२ वाजता फ्लोरिडा येथील नासाच्या केनेडी स्पेस सेंटरवरून हे मिशन लाँच करण्यात आले. सर्व अंतराळवीरांनी स्पेसएक्सच्या फाल्कन-९ रॉकेटशी जोडलेल्या ड्रॅगन कॅप्सूलमध्ये उड्डाण केले. ड्रॅगन अंतराळयान शुक्रवारी दुपारी ४.३० वाजता सुमारे २८.५ तासांनंतर आयएसएसशी जोडले जाईल.





अमेरिकन अंतराळ संस्था नासा आणि भारतीय एजन्सी इस्रो यांच्यातील करारानुसार, भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांची या मोहिमेसाठी निवड करण्यात आली आहे.

शुभांशू हे आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर जाणारे पहिले आणि अंतराळात जाणारे दुसरे भारतीय असतील. ४१ वर्षांपूर्वी राकेश शर्मा यांनी १९८४ मध्ये सोव्हिएत युनियनच्या अंतराळयानातून अंतराळात प्रवास केला होता.

#### भारतीयांची छाती अभिमानाने फुलली पाहिजे

"भारत ४१ वर्षांनंतर अवकाशात परतत आहे आणि हा एक अद्‌भुत प्रवास आहे. हा प्रवास भारताच्या मानवी अंतराळ कार्यक्रमाची सुरुवात असल्याने सर्व भारतीयांची छाती अभिमानाने फुलली पाहिजे. जय हिंद! जय भारत! अशा शब्दांत अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांनी अंतराळयानातून पहिली प्रतिक्रिया दिली आहे.

ॲक्स-४ मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट अंतराळात संशोधन करणे आणि नवीन तंत्रज्ञानाची चाचणी करणे हे आहे. हे अभियान खासगी अंतराळ प्रवासाला प्रोत्साहन देणे देखील आहे आणि भविष्यात व्यावसायिक अंतराळ स्थानक (ॲक्सियम स्टेशन) बांधण्याची योजना असलेल्या ॲक्सियम स्पेस प्लॅनिंगचा एक भाग आहे.

शुभांशू यांचा जन्म १९८६ मध्ये उत्तर प्रदेशातील लखनऊ येथे झाला. त्याने एनडीएमधून शिक्षण घेतले. ते २००६ मध्ये हवाई दलात सामील झाले आणि लढाऊ विमाने उडवण्याचा अनुभव आहे. त्यांची निवड इस्रोच्या गगनयान मोहिमेसाठीही झाली आहे, जी भारताची पहिली मानवी अंतराळ मोहीम आहे. अंतराळवीर होण्यासाठी त्याने रशिया आणि अमेरिकेत विशेष प्रशिक्षण घेतले. त्याने सूक्ष्म गुरुत्वाकर्षण, आपत्कालीन हाताळणी व वैज्ञानिक प्रयोगांमध्ये काम करायला शिकले.

शुभांशू १४ दिवस तिथे राहील व ७ प्रयोग करतील, जे भारतीय शैक्षणिक संस्थांनी तयार केले आहेत. यापैकी बहुतेक जैविक अभ्यास असतील, जसे की अंतराळातील मानवी आरोग्यावर व जीवांवर होणारा परिणाम पाहणे. तो नासासोबत आणखी ५ प्रयोग करतील, जे दीर्घ अंतराळ मोहिमांसाठी डेटा गोळा करेल.

या मोहिमेतील प्रयोग भारताच्या गगनयान मोहिमेला बळकटी देतील, असे सांगण्यात येत आहे.

## माळेगाव साखर कारखान्यावर अजित पवारांचेच वर्चस्व

**पुणे (प्रतिनिधी) :** माळेगाव कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील निळकंठेश्वर पॅनलने २० जागा जिंकत नेतृत्वाचा करीश्मा



सिध्द केला. गुरुशिष्यांचा सहकार बचाव पॅनलला अवघ्या एका जागेवर समाधान मानाने लागले. यामध्ये चंद्रराव तावरे निवडुन आले, तर रंजन तावरे यांना पराभवाला सामोरे जावे लागले. शरद पवार गटाला सभासदांना सपशेल नाकारले. उपमुख्यमंत्री पवार यांनी ब वर्गातून स्वतःची उमेदवारी जाहिर करुन स्वतःचेच नाव चेअरमन पदासाठी घोषित केले. अजित पवार यांनी ही निवडणुक गांभीर्याने घेत स्वतःची रणनिती आखली. आठ ते दहा दिवस कारखाना कार्यक्षेत्रात तळ ठोकत सभासदांच्या गाठीभेटी घेत नाराजी दुर करण्याचा प्रयत्न केला. विरोधकांच्या आरोपांना उत्तर देत निवडणुकीची हवा व निकाल वळवण्यात अजित पवार यांनी यश मिळविले. या निकालाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माळेगाव कारखान्यावर सत्ता येणार, हे स्पष्ट झाले आहे.

# वाढीव मतदानासंदर्भातील याचिका फेटाळली

### उच्च न्यायालयाचा प्रकाश आंबेडकरांना धक्का

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या निकालावर सर्वच विरोधी पक्षांनी शंका उपस्थित करत निवडणूक आयोगाला लक्ष्य केले होते. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी थेट निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सायंकाळी ६ नंतर वाढलेल्या ७६ लाख मतदारांचा आकडा संशयास्पद असल्याचे म्हटले होते. वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी याबाबत उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर २५ जून रोजी निकाल देण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार, बुधवारी प्रकाश



आंबेडकर यांची याचिका फेटाळताना न्यायालयाचा वेळ वाया घालवला, असे निरीक्षणही नोंदवले आहे.

प्रकाश आंबेडकर यांच्या वतीने ७६ लाख मतदारांचा मुद्दा उपस्थित करत न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र, प्रकाश आंबेडकर यांची याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. याचिकाकर्ते आणि आमचा कामकाजाचा वेळ वाया घातला, असे निरीक्षणही उच्च न्यायालयाने निर्णय देताना नोंदवले आहे. त्यामुळे, गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या वादावर आता न्यायालयाने आपला निर्णय स्पष्टपणे दिला आहे.

#### न्यायालयाच्या निर्णयावर आज मांडणार भूमिका

न्यायालयाने निर्णय दिला असून चेतन चंद्रकांत अहिरे यांची याचिका फेटाळली आहे. न्यायालयाकडून हा निकाल अपलोड झाल्यानंतर नेमकी याचिका फेटाळण्याचे कारण काय हे पाहता येईल. त्यानंतरच, मी माझी प्रतिक्रिया देईल, असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. गुरुवारी, २६ जून रोजी सकाळी ११.३० वाजता मी मुंबईतील कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधणार आहे, अशी माहितीही आंबेडकर यांनी दिली.

## आणीबाणीविरोधातील प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :** देशातील आणीबाणी लावल्याच्या घटनेला ५० वर्षे झाली आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपा सर्व देशभरात या आणीबाणीला विरोध दर्शवत काँग्रेसवर टीका करत आहे. यातच केंद्रीय मंत्रिमंडळाच्या झालेल्या बैठकीत आणीबाणीविरोधात प्रस्ताव सादर करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह उपस्थित मंत्र्यांनी या प्रस्तावाला अनुमोदन दिले.

**पंतप्रधान मोदींसह उपस्थित मंत्र्यांनी दिले अनुमोदन**

आणीबाणीला ५० वर्षे झाल्यानिमित्त केंद्र सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत एक ठराव मंजूर करण्यात आला. या ठरावात १९७५ मध्ये लादलेल्या आणीबाणीचे वर्णन 'लोकशाहीची हत्या' असे करण्यात आले आणि त्याचा तीव्र निषेध करण्यात आला. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी माहिती दिली की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत १९७५ मध्ये लादलेल्या आणीबाणीचा तीव्र निषेध करणारा ठराव मंजूर करण्यात आला.

# नाशिकमध्ये दोन अनधिकृत शाळांना नोटीस

### शोध मोहिमेला गती; सातशे विद्यार्थ्यांचे होणार समायोजन

**नाशिक (प्रतिनिधी) :** महापालिकेच्या अनधिकृत शाळा शोध मोहिमेत शहरात दोन अनधिकृत शाळा असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. मनपा प्रशासनाधिकारी डॉ. मिता चौधरी यांनी जेल रोड येथील सेंट्र फ्रान्सिस झेव्हियर व चुंचाळे येथील विमला देवी हिंदी विद्यामंदीर या दोन्ही शाळांना नोटीस काढली असून, सदर शाळांनी त्यांच्याकडील विद्यार्थ्यांचे मान्यताप्राप्त शाळेत समायोजन करावे, अशा सूचना दिल्या आहेत.

महापालिकेच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी अनाधिकृत शाळांचा शोध मोहीम हाती घेतली आहे. शहरातील २४ पर्यवेक्षकांवर ही जबाबदारी सोपवली आहे. शहरात ४४६ खासगी, तर १०१ शाळा मनपाच्या अशा एकूण ५४७ शाळा आहेत. शहरात कुणीही शिक्षण विभागाची परवानगी न घेता अनधिकृत शाळा काढून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळू नये याकरिता दरवर्षी अनधिकृत शाळांचा शोध घेतला जातो.

"शहरात जेल रोड व चुंचाळे या दोन ठिकाणी अनधिकृत शाळा असल्याचे समोर आले आहे. पालकांनी पाल्याचा प्रवेश घेताना सतर्क राहून अधिकृततेची खात्री करून घ्यावी. या दोन्ही शाळांमधील विद्यार्थ्यांचे समायोजन मान्यताप्राप्त शाळेत करण्याची जबाबदारी त्या शाळांवर दिली आहे. याबाबत त्वरित कार्यवाही न केल्यास त्यांच्यावर थेट गुन्हे दाखल केले जातील.

\- **डॉ. मिता चौधरी,** मनपा प्रशासनाधिकारी

#### दिवसाला होणार दहा हजार दंड

नोटीस देऊनही जर या शाळा सुरू ठेवल्यास या प्रकरणी दर दिवसाला दहा हजार रुपये दंडाप्रमाणे कारवाई करण्यात येईल. जेवढ्या दिवस शाळा सुरु असेल, तेवढ्या दिवसांचा दंड आकारला जाणार असल्याचे मनपा प्रशासनाने म्हटले आहे. तपासणी मोहिमेत मनपा प्रशासन अलर्ट मोडवर आले आहेत.

# पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला केंद्राची मंजुरी

### चांदणी चौक, बावधन, कोथरूड, खराडी, वाघोलीला मिळणार मेट्रो सुविधा

◆ पुणे (प्रतिनिधी) :

पुणे मेट्रोच्या विस्ताराला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आल्यामुळे पुण्यातील मेट्रोचा आता विस्तार होणार आहे. बुधवारी पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ बैठक झाली. या बैठकीत पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी देण्यात आली आहे. वनाझ ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली / विठ्ठलवाडी कॉरिडॉरला मंजुरी देण्यात आली. पुणे मेट्रो रेल प्रकल्पाचा टप्पा २ वनाझ ते चांदणी चौक (कॉरिडॉर २अ) आणि रामवाडी ते वाघोली/विठ्ठलवाडी (कॉरिडॉर २ब) या प्रकल्पाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. विद्यमान पुणे मेट्रो टप्पा-१ वनाझ-रामवाडीचा आता विस्तार होणार आहे.

हे दोन उन्नत कॉरिडॉर १२.७५ किमी लांबीचे असतील आणि त्यात १३ स्थानके असतील. चांदणी चौक, बावधन, कोथरूड, खराडी आणि वाघोली यासारख्या जलदगतीने विकसित होणाऱ्या उपनगरांना मेट्रो जोडली जाणार आहे. हा प्रकल्प चार वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

#### वाहतूक व्यवस्था सुरक्षित, पर्यावरणपूरक असणार

हे मार्ग लाइन-१ (निगडी–कात्रज) आणि लाइन-३ (हिंजवडी–डिस्ट्रिक्ट कोर्ट) या मेट्रो मार्गांशी 'डिस्ट्रिक्ट कोर्ट इंटरचेंज' स्थानकावर जोडले जाणार आहेत, ज्यामुळे प्रवाशांना सुलभ आणि एकात्मिक प्रवास अनुभवता येणार आहे. याचसोबत, मुंबई, बेंगळुरू, अहिल्यानगर, आणि संभाजीनगर येथून येणाऱ्या आंतरशहरी बस सेवा देखील या मेट्रो स्थानकांशी जोडल्या जाणार आहेत. २०२७ पर्यंत या विस्तारामुळे रोजच्या प्रवाशांची संख्या जवळपास ९६ हजारपर्यंत वाढेल, आणि २०५७ पर्यंत ती ३.५ लाखांहून अधिक होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या महत्त्वाच्या विस्तारामुळे पुण्याची वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित, गतिमान आणि पर्यावरणपूरक होणार असून, आर्थिक आणि शहरी विकासालाही चालना मिळेल.



प्रकल्पाचा अंदाजे खर्च ३६२६.२४ कोटी रुपये आहे. जो भारत सरकार, महाराष्ट्र सरकार आणि बाह्य द्विपक्षीय/बहुपक्षीय एजन्सींनी समान प्रमाणात वाटून घेणार आहे. संपूर्ण लाईन २ साठी २०१७ मध्ये ०.९६ लाख, २०३७ मध्ये २.०१ लाख, २०४७ मध्ये २.८७ लाख आणि २०५७ मध्ये ३.४९ लाख दैनंदिन प्रवासी संख्येत वाढ होण्याचा अंदाज आहे. हा प्रकल्प महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड द्वारे राबविला जाईल.

# पर्यटन योजनेतून एसटी बसमधून महाराष्ट्र फिरा

### प्रवास, जेवण, निवास सर्व काही मिळणार माफक दरात

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

तुम्हालाही राज्यभर फिरायची इच्छा आहे. पण खर्चाचा विचार करून मागे हटता? मग आता टेन्शन घेण्याचे काहीच कारण नाही! कारण महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने नागरिकांसाठी सुरू केली आहे, एक खास पर्यटन योजना. जिच्यामध्ये प्रवास, जेवण आणि निवास सगळे काही अगदी माफक दरात मिळणार आहे.

या योजनेअंतर्गत एसटी महामंडळाने खासगी ट्रॅव्हल कंपन्यांच्या सहकार्याने महाराष्ट्रातील प्रमुख धार्मिक स्थळांसाठी नियोजित सहलींचे आयोजन केले आहे. विशेष म्हणजे या सहलींमध्ये फक्त प्रवास नव्हे, तर राहण्याची आणि जेवणाचीही सोय असणार आहे.



#### एसटी पर्यटन योजनेचे मुख्य वैशिष्ट्ये

- धार्मिक स्थळांसाठी नियोजित सहली
- प्रवास, भोजन आणि निवासाचा एकत्रित लाभ
- सर्व वयोगटांसाठी परवडणारे दर
- कमी गर्दीच्या दिवसांत सहलींचं आयोजन
- विद्यार्थ्यांसाठी पासची सुविधा आता शाळेतच

त्यामुळे तुम्ही फक्त बॅग पॅक करा आणि निघा बाकी सगळे एसटी महामंडळ सांभाळेल! ही योजना सर्व वयोगटातील आणि सामाजिक गटांतील नागरिकांसाठी खुली आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला, तरुण प्रवासी आणि विद्यार्थी सगळ्यांना या सहलीतून फायदे मिळणार आहेत. अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांनाही ही योजना सहज परवडेल. या सहली गर्दीच्या काळात आयोजित केल्या जाणार नाहीत. त्यामुळे मंदिरांमध्ये त्रासदायक रांगा नाहीत, नाहक गडबड नाही फक्त शांत, आरामदायक आणि भक्तिमय अनुभव अनुभवयास मिळणार.

#### सोन्याचा भाव

| | |
|---|---|
| २४ कॅरेट प्रति तोळा | ९८,९५० रुपये |
| २२ कॅरेट प्रति तोळा | ९०,७०० रुपये |

#### चांदीचा भाव

| | |
|---|---|
| प्रति किलो | १,०८,००० रुपये |



गुरुवारी इक्विटी बेंचमार्क निर्देशांकात अखेरच्या सत्रात वाढ कायम राहिली आहे. सेन्सेक्स ७००.४० अंकाने वधारत ८२७५५.५१ पातळीवर, तर निफ्टी ५० निर्देशांकात २००.४९ अंकांची वाढ झाल्याने निफ्टी पातळी २५२४४.७५ पातळीवर पोहोचली आहे. सेन्सेक्स, निफ्टी यामधील स्मॉलकॅपमध्ये झालेल्या वाढीने बाजारात चैतन्याचे वातावरण कायम राहिले आहे.

### पालखी खांद्यावर घेत ग्रामस्थांकडून विसाव्याला प्रदक्षिणा

# पालखी सोहळ्यादरम्यान वाल्हेनगरीत वैष्णवांचा लोटला अलोट महासागर

◆ पुणे (प्रतिनिधी) :

नाम गाऊ नाम घेऊ।।
नाम विठोबाला वाऊ।।
आमि दहिवाचे दहिवाचे दास
पंढरीरायाचे।।

ही भावना मनी ठेवून कपाळी बुक्का, गंध लावून, खांद्यावर भगव्या पताका उंचावत लाखो वैष्णवांनी टाळ-मृदंगांच्या गजरात आद्य रामायणकार महर्षी वाल्मीकी ऋषींच्या वाल्हेनगरीत (ता. पुरंदर) माऊलींचा पालखी सोहळा विसावला. 'ज्ञानोबा-तुकाराम'चा जयघोष करीत आषाढी वारीसाठी पंढरपूरला निघालेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यादरम्यान वाल्हेनगरीत बुधवारी वैष्णवांचा अलोट महासागर लोटला होता.

खंडेरायाच्या जेजुरीनगरीचा निरोप घेऊन पहाटे ६च्या सुमारास टाळ-मृदंगांचा गजर व हरिनामाच्या जयघोषामध्ये पालखी सोहळा वाल्हेनगरीकडे मार्गस्थ झाला. सकाळी १०.३० वाजता दौंडज ग्रामपंचायतीच्या वतीने ग्रामस्थांनी पालखी सोहळ्याचे स्वागत केले. पालखीचा नगारखाना व श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा वाल्हेनगरीच्या (ता. पुरंदर) वेशीवर दाखल झाला.

#### पुढील वर्षी तरी व्हावी 'वाल्हे'ची ग्रामप्रदक्षिणा

वाल्हे गावची श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याची परंपरा असलेली ग्रामप्रदक्षिणा आळंदी देवस्थानकडून मागील काही वर्षांपासून पालखी तळावर पोहोचण्यास उशीर होत असल्याचे तसेच दुपारच्या जेवणाचे कारण देत बंद करण्यात आली आहे. यावर्षी पालखी सोहळा लवकरच महर्षी वाल्मीकी विद्यालयाजवळ सकाळी ११.४० वाजताच पोहोचला होता. यावर्षीही ग्रामप्रदक्षिणा झाली नसल्याने ग्रामस्थांमधून नाराजीचा सूर व्यक्त होत होता. पुढील वर्षी पालखी महामार्गाचे काम पूर्णत्वास जाईल व या वर्षापेक्षाही पुढील वर्षी पालखी सोहळा लवकर वाल्हे गावच्या वेशीवर पोहोचेल, असा अंदाज वर्तवत वाल्हे गावची ग्रामप्रदक्षिणा सुरू होईल, अशी आशा ग्रामस्थांना आहे.



#### आज पालखीचा लोणंदला

**मुक्काम :** स्वागतानंतर पोलीस प्रशासनाच्या वतीने योग्य नियोजनामुळे एक तासाच्या आत सुकलवाडी फाट्याजवळील पालखी तळावर हा सोहळा पोहोचला. रथामधून पालखी काढून ग्रामस्थांच्या खांद्यावर देण्यात आली. ग्रामस्थांनी पालखी खांद्यावर घेऊन नाचवत पालखी विसाव्याला प्रदक्षिणा घातली.

# वर्षातून दोनदा होणार दहावीची परीक्षा

### सीबीएसई बोर्डाचा निर्णय

◆ नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :

सीबीएसईने २०२६ पासून वर्षातून दोनदा १० वीच्या बोर्डाची परीक्षा घेण्यास मान्यता दिली आहे. परीक्षा नियंत्रक संयम भारद्वाज यांनी ही घोषणा केली आहे. त्यामुळे पुढच्या वर्षीपासून सीबीएसईच्या १० वी बोर्डाच्या वर्षातून दोन वेळा परीक्षा घेतल्या जातील. पहिल्या टप्प्यात फेब्रुवारी आणि दुसऱ्या टप्प्यात मे महिन्यात या परीक्षा होतील.

१० वीच्या बोर्डाच्या परीक्षेसाठी पहिल्या टप्प्यातील परीक्षेला हजर राहणे बंधनकारक आहे, तर दुसऱ्या टप्प्यातील परीक्षा पर्याय म्हणून आहे. मुलांचे अंतरिम मूल्यांकन केवळ एकदाच केले जाणार आहे. सीबीएसई बोर्डाच्या या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना गुणपत्रिकेत सुधारणा करण्याची संधी मिळणार आहे. जर एखाद्या विद्यार्थ्याला पहिल्या टप्प्यातील परीक्षेत कमी मार्क मिळाले तर त्याला दुसऱ्या टप्प्यातील परीक्षेत चांगली कामगिरी करण्याची संधी आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्डाने १० वीच्या वर्गासाठी वर्षातून दोनदा परीक्षा आयोजित करण्यास मान्यता दिली आहे.

सीबीएसईने हा निर्णय केंद्राचे नवीन शैक्षणिक धोरणाच्या शिफारशीवरून घेतला आहे.

## जिल्हा परिषद शाळांना...

राज्यात मराठी भाषेला तिसरा पर्याय म्हणून पहिलीपासून हिंदीची सक्ती यावरून राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या येऊ घातलेल्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधकांनी नव्याने कात टाकल्याप्रमाणे आक्रमक पवित्रा घेतला आहे. सत्ताधाऱ्यांनीदेखील काही प्रमाणात ङ्गबॅकफूटफ्ला जात सर्वसमावेशक चर्चा करून यावर निर्णय घेण्याचे जाहीर केले. मुळातच मराठी भाषेचा पुळका घेऊन राणा भीमदेवी थाटात उतरलेल्या राजकीय नेतेमंडळींचे मराठी भाषा, मराठी शाळांवरील प्रेम हे पुतना मावशीचे प्रेम असल्याचे मागील काही वर्षांमध्ये स्पष्ट झाले आहे. स्वतःची मुले इंग्रजी माध्यम, सीबीएसई बोर्ड, दिल्ली बोर्ड, इंटरनॅशनल बोर्ड, कॉन्व्हेंट शाळा अशा विविध इंग्रजाळलेल्या शाळांमध्ये घालायची आणि राजकीय व्यासपीठावरून मराठीच्या नावाने टाहो फोडत मराठी भाषिकांची मते मिळवायचा ङ्गफंडाफ गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात सुरू आहे. मुंबई शहर, उपनगरात तसेच कल्याण–डोंबिवली, नवी मुंबई, पालघर, पनवेल–उरण, बदलापूर, कर्जत–कसाऱ्यापर्यंत मराठी भाषेच्या शाळा गेल्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणावर बंद पडल्या असून त्या त्या शाळेतील शिक्षकांना ङ्गसरप्लसफ व्हावे लागल्याने त्यांना अन्य शाळांची शोधाशोध करण्याची वेळ आली आहे. नोकरी टिकविण्यासाठी सभोवतालच्या परिसरात जाऊन तेथील मुले आपल्या शाळांमध्ये आणण्यासाठी विविध प्रकारचे द्राविडी प्राणायम करावे लागत आहेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागात शिरकाव होऊ लागल्याने राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या अधिकाधिक जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थी संख्या घटल्याने तेथील शाळांनाही टाळे लावण्याची वेळ आज निर्माण झाली आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये गेल्या काही वर्षांपासून सातत्याने विद्यार्थ्यांची संख्या घटत असून यंदाही ही घसरण कायम राहिली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये त्या त्या ग्रामीण भागातील पालकांनी जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये मुलांना प्रवेश न देता इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश देण्यास प्राधान्य दिल्याने अनेक जिल्ह्यांमध्ये हजारोंच्या संख्येने विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषदेच्या शाळांकडे पाठ फिरवली आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षणावर हे संकट गडद होत असताना शिक्षण विभाग आणि तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी उदासीन असल्याचे चित्र आहे. विद्यार्थ्यांची कमी होणारी पटसंख्या शिक्षण विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण मोफत असूनही पालक खासगी शाळांमध्ये लाखो रुपये खर्च करून शिक्षणाची निवड करत आहेत, यावरून पालकांचा सरकारी शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास ढासळत असल्याचे स्पष्टपणे पाहावयास मिळत आहे. शासन समग्र शिक्षण अभियान, शाळा दत्तक योजना, डिजिटल क्लासरूम अशा योजना जाहीर करते व राबविते. मात्र त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी होते का, हाही प्रश्न आहे. पटसंख्या कमी होण्याचे प्रमाण येत्या काळात असेच कायम राहिले तर राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या अस्तित्वावरही प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये पटसंख्येची होणारी ही घसरण आताच थांबविली नाही तर, भविष्यात ग्रामीण भागातील शिक्षणाची आणखी अधोगती होणार, हे निश्चित आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये समग्र शिक्षा अभियान, शाळा समृद्धी योजना, डिजिटल क्लासरूम यांसारख्या योजनांची अंमलबजावणी नेमकी कुठे कमी पडते, याची पडताळणी होणे गरजेचे आहे. मोफत पुस्तके, गणवेश, पोषण आहार यावर कोट्यवधी रुपये खर्च करूनही जिल्हा परिषदेच्या शाळांमधील पटसंख्येत होणारी घट, ही गंभीर बाब आहे. जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये इंग्रजी माध्यमाच्या, सेमी इंग्रजी माध्यमांच्या अथवा सीबीएसई बोर्डाचे अभ्यासक्रम वेळीच सुरू केले असते तर ग्रामीण भागात महागडे शिक्षण देणाऱ्या इंग्रजी शाळांच्या संस्थांना शिरकाव करणेही अवघड झाले असते. जिल्हा परिषदेच्या शाळा टिकविण्यासाठी त्या त्या काळांतील राज्य सरकारच्या शिक्षण मंत्र्यांनी, शिक्षण विभागाने आजतागायत कधीही गांभीर्याने प्रयत्न केलेच नाहीत. शाळांमध्ये पटसंख्या कायम राहावी किंवा वाढावी यासाठी शिक्षण विभाग व शिक्षकांकडून अपुरे प्रयत्न झाल्याने गावागावातील मुलांचा खासगी शाळांकडे वाढता कल गेल्या काही वर्षांमध्ये राहिला आहे. परिणामी तेथील इंग्रजी माध्यम व सुविधा यामुळे अनेक पालक मुलांना खासगी शाळांमध्ये गेल्या काही वर्षांमध्ये पाठवू लागले आहेत. काही जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांची अनुपलब्धता, साधनसामग्रीची कमतरता हेही कारण आहे. जिल्हा परिषदांच्या शाळांना टाळे लागत आल्याने टाहो फोडण्यात आता काहीही अर्थ राहिलेला नाही. स्पर्धेमध्ये उतरण्यासाठी अथवा जिल्हा परिषद शाळांचे अस्तित्व टिकविण्यासाठी आता वरवरची मलमपट्टी नाही तर ठोस उपाययोजनांची गरज आहे. शहरी भागातील मराठी भाषा टिकविण्यासाठी आपल्याला आलेल्या अपयशाचा कलंक पुसून काढण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळा टिकविणे आवश्यक आहे. अनेक गावांमधील जिल्हा परिषदेच्या शाळांना टाळे लागले आहे. हे चित्र सर्व राज्यामध्ये दिसण्यापूर्वीच राज्य सरकारच्या शिक्षण विभागाने तसेच सत्ताधाऱ्यांनी, विरोधकांनीही एकत्रित येत प्रयत्न करणे आवश्यक आहे. हिंदी भाषेला पर्यायी भाषेचा दर्जा देण्याचा प्रयत्न करताच राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले; परंतु राज्याच्या ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांना लागत असलेले टाळे व त्या शाळांमधील शिक्षकांवर ङ्गसरप्लसफच्या नावाखाली येऊ घातलेली बेरोजगारीची वेळ याकडे पाहण्यास कोणालाही वेळ नाही. जिल्हा परिषदेच्या शाळांचे अस्तित्व न टिकल्यास गोरगरिबांच्या, शेतमजुरांच्या मुलांना आर्थिक गणितांची जुळवाजुळव न झाल्यास शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ येणार आहे. सर्वांनाच इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील महागडे शिक्षण परवडणारे नाही. जिल्हा परिषदेच्या शाळा टिकविण्यासाठी ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्यांनी एकत्रित येणे व गावागावातील ग्रामस्थांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे; परंतु दुसरीकडे जिल्हा परिषदेच्या शाळांतील शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठीही प्रयत्न झाले पाहिजेत. म्हातारी मेल्याचे दुःख नाही, पण काळ सोकावता कामा नये. या उक्तीप्रमाणे शहरी भागासाठी आपण काही करू शकलो नाही, निदान ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या मराठी शाळांच्या अस्तित्वासाठी संघटित होणे काळाची गरज आहे.

# पोदार लर्न स्कूलचे नाव परस्पर बदलले

## मुख्याध्यापक बी.पी. सिंग यांची शिक्षणाधिकाऱ्यांकडे तक्रार

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी;येथील राजस्थानीज पोदार लर्न स्कूल या नामांकित शाळेचे नाव म माउंट लिटेरा झी स्कूलफ असे बेकायदेशीरपणे बदलण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शाळेचे मुख्याध्यापक बी. पी. सिंग यांनी या प्रकाराबाबत बीड जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली असून, संबंधितांवर कडक कारवाईची मागणी केली आहे. दरम्यान मी अधिकृत रजेवर असताना, अशोक जैन, वंगे आणि कैलास घुगे या तिघांनी शाळेचे नाव परस्पर बदलून प्रशासकीय प्रक्रियेला हरताळ फासला. शाळा चालवण्याचे पूर्ण अधिकार संस्थाध्यक्षांनी मला दिलेले असतानाही, कोणतीही परवानगी न घेता शाळेचे नाव बदलणे ही गंभीर बेकायदेशीर कृती आहे, असे सिंग यांनी स्पष्ट केले.यावेळी शाळेच्या नावाबाबत संभ्रम निर्माण केला जात आहे. पालकांनी सजग राहून पुढील प्रवेश प्रक्रियेत योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहनही सिंग यांनी केले आहे. विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येऊ नये, म्हणून प्रशासनाने याची तातडीने दखल घ्यावी. संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.या तक्रारीनंतर बीड जिल्हा परिषद शिक्षण विभागाने याप्रकरणी लवकरच चौकशीसाठी समिती नेमण्याची घोषणा केली आहे.

शाळेच्या कार्यालयाचे कुलूप जबरदस्तीने फोडले गेले. शाळेचा ण–ऊखडए क्रमांक (७५७५०८००८८१००८०७५७५) व उइडए मान्यता (–षषळश्रळरींळेप छे. ११३०८०८) हे पोदार लर्न स्कूल या नावाने नोंदणीकृत आहेत. तरीही नव्या नावाने शाळा चालवून पालक आणि विद्यार्थ्यांची दिशाभूल केली जात आहे.ढउ (शाळा सोडताना दिले जाणारे प्रमाणपत्र) कोणत्या नावाने दिले जात आहे, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### “संस्थेचे कैलास घुगे यांच्यावर...

यामध्ये नांदेड शहरातील काही संस्थांना यातील कैलास घुगे यांनी गंडा लावल्याच समोर येत आहे, त्यानंतर गोपीनाथ मुंडे अकॅडमी यामागे ही घुगे असल्याच जनतेत बोलल जात आहे, बन्सल क्लासेस आणि त्यानंतर पोद्दार लर्न स्कूल या सर्व घटनेमागे कैलास घुगे यांचे नाव प्रकर्षाने समोर येत आहे. नेमक या सर्व आरोपांमध्ये सत्य काय हे लवकर समोर येईल– परंतु कैलास घुगे परळीच्या शिक्षण संस्थेमध्ये नाव सातत्याने पुढे काय येत आहे याचीही माहिती या चौकशीतून समोर येईल असं अनेक जाणकार व्यक्तींनी बोलून दाखवलं.

# बीडच्या कोचिंग क्लासमध्ये लैंगिक अत्याचार

## वंचितचे अप्पर पोलीस अधीक्षक यांना निवेदन

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:शहरातील एका नामांकित कोचिंग क्लासमध्ये ३० जुलै २०२४ ते २५ मे २०२५ या कालावधीत अल्पवयीन विद्यार्थिनीवर कथित लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणात कोचिंग क्लासचे शिक्षक प्रशांत खाटोकर व विजय पवार यांच्यावर पीडित विद्यार्थिनीने गंभीर आरोप केले आहेत. या दोघांनी वर्गानंतर केबिनमध्ये बोलावून अश्लील वर्तन केल्याचा आणि तिचे फोटो काढून मानसिक छळ केल्याचा आरोप आहे.पीडितेच्या पालकांनी माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, झजउडज कायद्याअंतर्गत तसेच भारतीय दंडविधानाच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, दोन्ही आरोपी अद्याप फरार आहेत.या प्रकरणात आरोपी विजय पवार हे राज्यातील काही राजकीय दिग्गजांशी घनिष्ठ संबंध ठेवत असल्याची माहिती पुढे आली असून, त्यांनी शिक्षण संस्थांच्या माध्यमातून मोठी आर्थिक संपत्ती उभी केल्याचे वृत्त आहे. त्यामुळे या प्रकरणात राजकीय आणि आर्थिक दबावामुळे चौकशीवर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या बीड जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी प्रशासनाला ठाम इशारा देत सांगितले की, आरोपींना तात्काळ अटक करून निष्पक्ष व जलद चौकशी व्हावी. या प्रकरणाला कोणत्याही प्रकारे जातीय रंग देण्याचा प्रयत्न होऊ नये. त्यांनी पुढील मागण्या केल्या: दोन्ही आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी.प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करावी. पीडितेला मानसिक, वैद्यकीय व कायदेशीर मदत तत्काळ उपलब्ध करून द्यावी.कोचिंग क्लासेससाठी स्पष्ट व सक्त सुरक्षा नियमावली तयार करून लागू करावी.यासंदर्भात जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन आणि पोलीस अधीक्षक श्री. नवनीत सर यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे पुरुषोत्तम वीर, ज्ञानेश्वर कवठेकर, रोहन मगर, लखन जोगदंड, प्रकाश उजगरे, प्रदीप खळगे, मिलिंद सरपते यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.या घटनेने बीड शहरात खळबळ उडाली असून, नागरिकांत संतापाचे वातावरण आहे. आता प्रशासन आणि पोलिसांची भूमिका काय राहते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



“ लैंगिक छळ करणारे विजय पवार व खाटोकर यांना खूप मोठ्या प्रमाणात राजकीय पाठबळ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणाला सामाजिक व जातीय रंग देऊन दडपण्याचा प्रयत्न केला जाईल. नवनीत सर पोलीस अधीक्षक बीड यांच्यावर विश्वास असून ते या प्रकरणात हयगय करणार नाहीत हे स्पष्ट दिसत आहे. परंतु राजकीय दबावाचा वापर करून त्यांना अटकेपासून दूर ठेवले जाईल असे दिसत आहे करिता वंचित बहुजन आघाडीची प्रमुख मागणी विजय पवार यांना तात्काळ अटक करावे.

अजय सरवदे
जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड

# नारीशक्तीची डिजिटल भरारी

पूर्वी डिजिटल साक्षरता मोठ्या शहरांपर्यंतच मर्यादित होती, मात्र तिची व्याप्ती कमी होती आणि ग्रामीण महिलांसाठी तर तंत्रज्ञान नावाची एखादी गोष्टच अस्तित्वात नव्हती. मात्र डिजिटल इंडिया मिशनअंतर्गत सुरू केलेल्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे हे चित्र पूर्णपणे बदलले आहे. विशेषतः २०१७ मध्ये प्रधानमंत्री ग्रामीण डिजिटल साक्षरता अभियान या योजनेने कोट्यवधी ग्रामीण महिलांना डिजिटल स्वरूपात सक्षम केले आहे. आता त्या स्मार्टफोन, इंटरनेट आणि डिजिटल साधनांच्या माध्यमातून सरकारी योजना, बँकिंग सेवा, टेलिमेडिसिन आणि इतर सुविधांचा थेट लाभ घेत आहेत. या अभियानांतर्गत ६ कोटींहून अधिक लोकांना प्रशिक्षित करण्यात आले आहे,२०१४ मध्ये सुरू झालेली प्रधानमंत्री जन धन योजना, जी जनधन, आधार, मोबाईल यांच्या त्रिसूत्री सोबत मिळून जगातील सर्वात मोठा आर्थिक समावेशन कार्यक्रम बनली आहे. तिने भारतात आर्थिक सक्षमीकरणाची नवी गाथा लिहिली आहे. पूर्वी जिथे कोट्यवधी महिलांकडे बँक खाती सुद्धा नव्हती आणि सरकारी लाभाचे पैसे मध्यस्थांच्या हातात जात होते, तिथे आता जनधन, आधार आणि मोबाईलच्या त्रिसूत्रीने आर्थिक समावेशनाला एक नवी दिशा दिली आहे. या डिजिटल क्रांतीमुळे महिला थेट लाभ हस्तांतरण प्रक्रियेद्वारे थेट त्यांच्या बँक खात्यांमध्ये सरकारी योजनांचा लाभ मिळवत आहे. तंत्रज्ञान–आधारित मंचांनी शिक्षण आणि रोजगाराच्या क्षेत्रात महत्त्वाचे बदल घडवले आहेत. स्किल इंडिया मिशन आणि ई–स्किल इंडियासारख्या कार्यक्रमांमुळे लाखो मुलींना आणि महिलांना आता त्यांच्या मोबाईलवर प्रशिक्षण मिळत आहे. यामुळे त्या उत्तम कौशल्ये शिकून स्वावलंबी बनत आहेत आणि रोजगाराच्या नवीन संधी प्राप्त करू शकत आहेत. हा बदल पूर्वीची मर्यादित संसाधने आणि पोहोच यापेक्षा खूपच जास्त व्यापक आणि सशक्त आहे. ड्ढ–ध–च् आणि ऊखघड्ड– सारख्या पोर्टल्सनी महिलांना शिक्षणाशी जोडण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे, विशेषतः कोरोना महामारीच्या काळात जेव्हा संपूर्ण जग थांबल्यासारखे झाले होते. आता महिला आणि बाल विकास मंत्रालय आणि कौशल्य विकास मंत्रालय यांच्या संयुक्त उपक्रमांतर्गत १९ राज्यांमधील २७ जिल्ह्यांमध्ये किशोरवयीन मुलींना डिजिटल साक्षरतेसोबतच रोजगारभिमुख प्रशिक्षण दिले जात आहे. एक काळ होता, ज्यावेळी महिलांचे लहान व्यवसाय घराच्या चार भिंतींपुरतेच मर्यादित होते आणि बाजारापर्यंत पोहोचणे हे एक मोठे आव्हान होते. पण, गेल्या काही वर्षांत महिलाप्रणीत स्टार्टअप्स आणि लघू उद्योगांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षांत, डिजिटल तंत्रज्ञानाने महिलांच्या जीवनात अभूतपूर्व क्रांती घडवून आणली आहे. २०१४ पासून आतापर्यंत, सर्वसमावेशक धोरणे, सुनियोजित प्रशिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या




सुलभतेमुळे लाखो महिलांना आत्मनिर्भरतेच्या मार्गावर आणले आहे. अमृत काळाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या भारतात, हे परिवर्तन महिलांना केवळ विकासातील भागीदारच नव्हे, तर या विकास यात्रेच्या नेत्या बनवत आहे. एक डिजिटली सक्षम महिला आज केवळ लाभार्थी नाही, तर विकसित भारताची निर्माती आहे.

२०१४ मध्ये, ज्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली देशात एका निर्णायक बदलाची सुरुवात झाली, तेव्हापासून भारताने डिजिटल प्रगतीची एक नवीन दिशा निश्चित केली. या ११ वर्षांत मडिजिटल इंडिया मिशनफ सारख्या लोक–केंद्रित मोहिमांनी कोट्यवधी नागरिकांच्या जीवनावर प्रभाव टाकला आहे. विशेषतः महिलांसाठी हे परिवर्तन आत्मनिर्भरता, सक्षमीकरण आणि सन्मानाच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल ठरले आहे. आजच्या २१व्या शतकात तंत्रज्ञान केवळ प्रशासन आणि अर्थव्यवस्थेमध्येच नाही, तर सामाजिक रचनेतही बदल घडवत आहे आणि या बदलाचे सर्वात सशक्त उदाहरण म्हणजे त्या महिला आहे. ज्या डिजिटल युगात नवीन संधींसह नवी भरारी घेत आहे.

## :पान सहा वरुन:

### लोकांना चुना

बीड येथे अटकपूर्व जामीन मिळणे कामे अर्ज दाखल केला होता सदर जामीन अर्जात ड.शेख इमरान खाजा इमरान खाजा यांनी आक्षेप घेत न्यायालयासमोर आरोपीने लाखों रुपयांची सर्वसामान्य लोकांची फसवणूक केलेली असल्याबाबत कागदपत्र दाखल करत माननीय न्यायालयाचे निदर्शनास आणून दिले व आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली या कायदेशीर बाबी ग्राह्य धरून माननीय न्यायालयाने आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केला. यावेळी आक्षेप अर्जदार यांचे वतीने ॲड .शेख इमरान खाजा यांनी न्यायालयीन बाजू मांडली. त्यांना ॲड.पंकज रायबोळे, ॲड.सूर्यकांत पवार, ॲड. शेख अनवर यांनी सहकार्य केले.

### आदित्य महाविद्यालयामुळ

विद्यार्थी येथे घडतो.या यशाबद्दल वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी परिषद सदस्या व आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी अभिनंदन करताना सांगितले, शहरी मुलांप्रमाणे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही उत्तम संधी मिळायला हव्यात, यासाठी आमचा प्रयत्न असतो. राजप्रकाश याने मिळालेल्या संधीचे सोन केलं आणि तो आज शासकीय सेवेत रूजू होणार आहे. इतर विद्यार्थ्यांनीही महाविद्यालयात आयोजित केलेल्या प्रत्येक कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेवून यश मिळवावे.

### पत्रकारास माथेफिरुची

संरक्षण कायद्याअंतर्गत कार्यवाही करण्यात यावी अशी फिर्याद दाखल केली.या अगोदर सुद्धा या व्यक्तीने सुरेश मोरे यांच्यासोबत असाच प्रकार दोन वेळा केलेला आहे. तरी माझ्यावर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी व पत्रकारांना निर्भीडपणे आपल्या कामासाठी मुक्त संचार करता यावा तसेच अशी वेळ कोणत्याही पत्रकार बांधवावर येऊ नये यासाठी राज्यस्तरीय,जिल्हा तालुका गाव परिसरातील सर्व पत्रकार बांधवांना सुरेश मोरे यांनी सहकार्यासाठी आव्हान केले आहे .अन्यथा त्या व्यक्तीच्या हातून माझा घातपात होईल किंवा मला आत्महत्या करण्याशिवाय पर्याय उरणार नाही या व्यक्तीपासून माझ्या जीवाला धोका आहे अशी खंत पत्रकार सुरेश मोरे यांनी व्यक्त केली आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## कल्याणमध्ये काँग्रेसच्या वतीने महामृत्युंजय जप

**कल्याण :** राज्यात सुरू असलेल्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसतर्फे कल्याणमध्ये महामृत्युंजय जप करण्यात आला. २०२५ मध्ये कुंभ मेळा, विमान आणि मुंब्रा रेल्वे अपघातांमुळे झालेल्या मृत्यूंच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचा महामृत्युंजय जप व हवनाचा अनोखा उपक्रम घेण्यात आला. नागरिकांच्या सुख, शांती आणि दीर्घायुष्यासाठी सकारात्मक ऊर्जेसाठी कल्याण डोंबिवली काँग्रेस जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी हा धार्मिक उपक्रम राबवला. २०२५ हे वर्ष सुरू झाल्यापासून राज्यात व देशात अनेक दुर्दैवी घटना घडल्या आणि घडत आहेत यात अनेक निरपराध, निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे. ही स्थिती पाहता, येणाऱ्या काळात सर्व नागरिकांना स्थैर्य, सुख, शांती आणि दीर्घायुष्य लाभावे यासाठी तसेच सकारात्मक ऊर्जेसाठी आणि सार्वत्रिक कल्याणासाठी कल्याण पूर्वेतील विठ्ठल मंदिरात महामृत्युंजय जप व हवन करण्यात आल्याची माहिती काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी दिली.

# घोडबंदर रोड सिग्नलजवळ वेग नियंत्रक पट्ट्या प्रायोगिक तत्वावर लावा

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले निर्देश

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

घोडबंदर रोडवरील पाच वाहतूक सिग्नलपाशी प्रायोगिक तत्त्वावर रम्बलर (वेग नियंत्रक पट्ट्या) लावण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. हा प्रयोग यशस्वी झाल्यास घोडबंदर रोडवरील सर्वच सिग्नलपाशी त्यांची अमलबजावणी करण्यात येणार आहे.

अपघात टाळण्यासाठी सिग्नलपाशी वाहनांचा वेग कमी करून अवजड वाहने नियंत्रित करण्याची आवश्यकता असल्याचे मत जस्टिस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींनी बैठकीत मांडले. या सूचनेचा अवलंब करण्यासाठी महापालिकेचा सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वाहतूक पोलीस यांनी संयुक्तपणे पाच ठिकाणांची निवड करावी. तेथे प्रायोगिक तत्त्वावर ही व्यवस्था करावी, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले. हा प्रयोग करताना वाहन चालकांना दिसेल अशा पद्धतीने त्याचा इशारा देणारी पाटी, रिफ्लेक्टर्स आदी गोष्टी शास्त्रशुद्ध पद्धतीने



कराव्यात. इंडियन रोड काँग्रेसने निर्धारित केलेल्या सर्व मार्गदर्शक नियमांचे पालन करावे, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

घोडबंदर रस्ता आणि परिसरातील नागरी कामांविषयी चर्चा करण्यासाठी जस्टिस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींसोबत बैठकीचे आयोजन महापालिका आयुक्त कार्यालय येथे नुकतेच करण्यात आले होते. आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत वाघबीळ येथील अंतर्गत रस्ता, भाईंदरपाडा आणि साईनगर येथील सेवा रस्त्याची दुरावस्था, रोझा गार्डिनिया येथील प्रस्तावित वाहतूक बेट आदी विषय प्रतिनिधींनी मांडले. त्यावर, कालबद्ध कार्यक्रम घेऊन पूर्तता करण्याचे निर्देश आयुक्त राव यांनी संबंधित विभागांना दिले. तसेच, रस्त्यावरील राडा रोडा, वायरी, अनावश्यक बॅरिकेड्स आदी काढून टाकरण्यासाठी महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, मेट्रो आणि एमएमआरडीए यांनी संयुक्तपणे सर्वंकष स्वच्छता मोहीम (डीप क्लिन ड्राईव्ह) घ्यावी,असेही आयुक्त राव यांनी सांगितले.

गायमुख आणि परिसरातील कचऱ्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी बहुपर्यायी उपाययोजना करण्याची आवश्यकता प्रतिनिधींनी व्यक्त केली. तसेच, काही मोठ्या गृहसंकुलांनी छोटेखानी कचरा प्रक्रिया प्रकल्प सुरू करण्याची तयारी दर्शवल्याचेही या प्रतिनिधींनी सांगितले. घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी व्यापक लोकसहभागाची आवश्यकता असून त्यासाठी महापालिका प्रयत्न करीत आहे, असे आयुक्त राव यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच, ज्या गृहसंकुलांनी घनकचरा व्यवस्थापनात रस दाखवला आहे, त्यांच्या पदाधिकाऱ्यांसोबत अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्याकडे बैठक आयोजित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व रिक्षा थांब्यांचे वाहतूक पोलीस, परिवहन विभाग आणि महापालिका यांच्यामार्फत संयुक्त पाहणी करण्याचे या बैठकीत ठरले. रिक्षा थांब्यांच्या जागा निश्चित करून त्यांचे नियमन करण्यात येईल, असे पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट यांनी सांगितले.

### अन्यथा ठेकेदाराला कल्याण-डोंबिवलीत फिरू न देण्याचा इशारा

## जुन्या कंत्राटी सफाई कामगारांना सेवेत सामावून घ्या



◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने घनकचरा विभागात नवीन ठेकेदार नियुक्त केला असून या नव्या ठेकेदाराने जुन्या कंत्राटी कामगारांना न घेता नव्याने कामगार भरती केली आहे. यामुळे ६०० कामगार घरी बसले असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. याविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने या कंत्राटी कामगारांसह केडीएमसी मुख्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. आधीच्या कंत्राटी कामगारांना कामावर न घेतल्यास सबंधित ठेकेदाराला कल्याण-डोंबिवलीत फिरू न देण्याचा इशारा मनसेचे जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर यांनी यावेळी दिला. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कामगार कर्मचारी सेना कल्याण डोंबिवली अध्यक्ष उल्हास भोईर, महाराष्ट्र उपाध्यक्ष राजेश उज्जैनकर, कार्याध्यक्ष रोहन आक्केवार, सरचिटणीस कपिल पवार, चिटणीस भिमदास जाधव, गणेश लांडगे, युनिट अध्यक्ष मच्छिंद्र तांदळे, कैलास पारधी, रतन चव्हाण, अविनाश पाटील आदी पदाधिकाऱ्यांसह कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

महानगरपालिकेच्या घनकचरा विभागात सुमारे ३५२ वाहनचालक व ११२० सफाई कामगार सेक्युर वन सिक्युरिटी सर्विसेस मध्ये काम करत होते. त्यानंतर महापालिकेतर्फे सुमित एल्कोप्लास्ट प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला ठेका देण्यात आला. महापालिकेच्या धोरणाप्रमाणे कंत्राटदार बदलला तरी कामगार तेच राहतील, याला अनुसरून नवीन कंत्राटदार सुमित एल्कोप्लास्ट प्रायव्हेट लिमिटेड या कंत्राटदाराने या कामगारांपैकी आत्तापर्यंत सुमारे ६०० कामगारांची चाचणी घेऊन त्यापैकी फक्त ३०० कामगारांना सेवेत रुजू करून घेतले व उर्वरित कामगारांना कामावर घेणे अपेक्षित असताना बाह्य यंत्रणेद्वारे कामगारांची भरती चालू केली असून एकप्रकारे कंत्राटदार कामगारांवर अन्याय करत आहे.

सनदशीर मार्गाचा अवलंब म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण महापालिका कामगार कर्मचारी सेने तर्फे औद्योगिक न्यायालय दावा क्रमांक ५७/२०२५ दावा केला होता. त्यात या नमूद कामगारांच्या यादी पैकी कामगारांना कामावर घेण्याचे आदेश न्यायालयाने सुमित एल्कोप्लास्ट प्रायव्हेट लिमिटेड यांना दिलेले असूनही हा कंत्राटदार औद्योगिक न्यायालयातील यादीतील नावे वगळून बाहेरील कामगारांची भरती करत आहे. याकडे केडीएमसी प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी मनसेच्या वतीने केडीएमसी मुख्यालयावर मोर्चा काढत धडक दिली.

## वेचक

### सफाई कामगारांच्या वारसा हक्काची अंमलबजावणी करण्याचे निर्देश

**अंबरनाथ :** दिनांक २५/०६/२०२५ रोजी अंबरनाथ नगरपरिषद येथे लाड समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्क पध्दतीने नियुक्ती आदेश देण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी विद्यमान आमदार बालाजी किणीकर हे उपस्थित होते. लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक २४/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारीत तरतुदी करणेत आल्या. तसेच मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथील दिनांक ०८/०१/२०२५ रोजीच्या आदेशान्वये न्यायालयाने वरील शासन निर्णय तरतुदीनुसार कार्यवाही करून सफाई कामगारांच्या वारसा हक्काची अंमलबजावणी करणेबाबत निर्देश दिले. त्या अनुषंगाने अंबरनाथ नगरपरिषदेतील वारसा हक्काच्या प्राप्त प्रलंबित प्रकरणांची छाननि करून ५२ सफाई कामगारांच्या नियुक्तीचे आदेश देण्यात आले.

### संविधान रॅलीत हजारो विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**कल्याण :** संविधान हे जिवंत डॉक्युमेंट( दस्तऐवज) म्हणून सर्वांनीच संविधानाचे जतन करणे आवश्यक असे प्रतिपादन नुकतेच महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी केले. शासनाच्या निर्देशानुसार आणीबाणीच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अत्रे रंगमंदिरातील संपन्न झालेल्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले. संविधानाने आपल्याला बऱ्याच प्रकारचे स्वातंत्र्य दिले आहे, हे स्वातंत्र्य असले तरी काही बंधने आणि सीमा आपण नागरिक म्हणून पाळल्या पाहिजेत, आणीबाणीच्या कालावधीत घडलेल्या घटनांवर चर्चा होवून, संविधानात काही बदल केले गेले. त्यामुळे संविधान अजून मजबुत झाले. त्यामुळे आजच्या ह्या आणीबाणीच्या वर्धापन दिनी, आणीबाणीच्या काळात ज्यांनी लढा दिला, त्यांचे स्मरण करणे हे गरजेचे आहे, असेही ते पुढे म्हणाले. यावेळी आचार्य अत्रे रंगमंदिराच्या तळ मजल्यावर प्रदर्शित करण्यात आलेल्या आणीबाणी विषयक चित्रांच्या प्रदर्शनाचे आणि डिजीटल स्टॅन्डीवरील माहितीपर छायाचित्रांचे उद्घाटन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. आणीबाणीचा वर्धापन दिन म्हणजे संविधानाबाबतची आस्था, लोकशाहीचा जागर आणि राष्ट्राबाबतचे प्रखर प्रेम दर्शविण्याचा दिवस होय, असे उद्गार महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी यावेळी आपल्या भाषणात काढले.

### पूर्णिमा कबरे यांचे निधन

**अंबरनाथ :** अंबरनाथच्या माजी नगराध्यक्षा आणि भाजपाच्या ज्येष्ठ पदाधिकारी नेत्या पूर्णिमा कबरे यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी (ता. २४) पहाटे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती सुधीर कबरे आणि भाजयुमोच्या प्रदेश पदाधिकारी पायल कबरे असा परिवार आहे.लोकनगरी परिसरातील वैकुंठधाम स्मशानभूमीत पूर्णिमा कबरे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी आमदार संजय केळकर, आमदार डॉ. बालाजी किणीकर, सर्वपक्षीय राजकीय, सामाजिक क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

### ३५ गोशाळांना नोंदणी प्रमाणपत्रांचे वितरण

**ठाणे :** महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणी करिता अर्ज केलेल्या गोशाळांना अधिकृत नोंदणी प्रमाणपत्रांचे वितरण सोहळा नुकतेच जिल्हा परिषदेच्या सभागृहात पार पडला.



या कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रशांत कांबळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अजिंक्य पवार, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. वल्लभ जोशी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. किर्ती डोईजोडे तसेच तालुकास्तरीय पशुवैद्यकीय अधिकारी, गोशाळा व्यवस्थापक आणि प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी सांगितले की, "सामाजिक सहभागातून राबविण्यात येणाऱ्या अशा पशुसंवर्धन उपक्रमांना जिल्हा परिषद ठाणे नेहमीच सहकार्य करत आली आहे. पशुधनाच्या आरोग्य संवर्धनाबरोबरच गोशाळांनी विविध उत्पादनांची निर्मिती करून स्वयंपूर्णता व उत्पन्नवाढ साधावी, यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल." हा कार्यक्रम जिल्हा परिषद ठाणेच्या पशुसंवर्धन विभागाच्या नियोजनबद्ध अंमलबजावणीचे उत्तम उदाहरण ठरले असून, जिल्ह्यातील इतर गोशाळांनीही अशाच उपक्रमांतून पुढाकार घेण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## रस्त्यामधोमध असलेली पाइपलाइन कडेला स्थलांतरित करण्याची मनसेची मागणी



◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

कल्याण पश्चिमेतील सहजानंद चौक ते अहिल्याबाई चौक येथे सार्वजनिक विभागा कडून रस्ता सिमेंट काँक्रिट करण्याचे काम सुरु आहे. येथील रस्त्याच्या मधोमध असलेली पाणीपुरवठयाची लाईन रस्त्याच्या कडेला स्थलांतरित करण्याची मागणी मनसेचे अहिल्याबाई चौक शाखा अध्यक्ष संदीप पंडित यांनी केडीएमसीच्या पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. काही दिवसांपूर्वी कल्याण पश्चिमेतील पुष्पराज हॉटेल, मोहम्मद अली चौक येथे पाण्याची पाईपलाईन फुटल्याने सिमेंट काँक्रिटचा रस्ता तोडावा लागला. सहजानंद चौक ते अहिल्याबाई चौक या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरु असून या रस्त्याच्या मधोमध देखील पाण्याची मोठी पाईपलाईन आहे. यामुळे भविष्यात कुठलीही पाण्या संदर्भात समस्या उद्भवली असता ही पाईपलाईन रस्त्याच्या कडेला असल्यास सहज सोडवता येईल. त्यामुळे रस्त्याच्या मधोमध पाणीपुरवठ्याची लाईन ही रस्त्याच्या कडेला स्थलांतरित करण्याची मागणी संदीप पंडित यांनी केली आहे.

## ठाण्यात बॅनरबाजीचा झगमगाट

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

गेल्या साडेतीन वर्षांपासून ठाणे महापालिकेमध्ये कोणताही अधिकृत नगरसेवक नसतानाही महापालिका प्रशासनाचा कारभार सुरळीतपणे सुरू आहे. मात्र निवडणुका न झालेल्या काळात देखील अनेक माजी नगरसेवक आणि राजकीय पदाधिकारी 'आमच्याच प्रयत्नातून काम' झाल्याचा दावा करत ठिकठिकाणी बॅनर लावून प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. यामुळे शहरात बॅनरबाजीचा अक्षरशः सुळसुळाट झाला आहे.

माजी नगरसेवकांनी लावलेल्या या बॅनर्सवर सार्वजनिक कामांचे श्रेय स्वतःकडे वळवण्याचा स्पष्ट प्रयत्न दिसून येतो. 'पाणी योजना पूर्ण – आमच्या प्रयत्नातून', 'रस्ता काँक्रीटीकरण – आमच्या पाठपुराव्याचा परिणाम', अशा आशयाचे बॅनर्स नागरिकांच्या नजरेस



### माजी नगरसेवकांच्या प्रचारातून निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये नाराजी

पडत आहेत. विशेष म्हणजे, या बॅनर्समध्ये महापालिका प्रशासनाचा उल्लेखही नसतो, जणू सर्व निर्णय हे त्यांच्या 'सांगण्यावरूनच' झाले आहेत, असा त्याचा आभास निर्माण केला जातो. मात्र या बॅनरबाजीमुळे संबंधित पक्षातील निष्ठावंत कार्यकर्ते मात्र दुखावले जात आहेत. 'नगरसेवक नसतानाही केवळ पुढील निवडणुकीत उमेदवारी हवी म्हणून प्रसिद्धीच्या हव्यासापोटी या प्रकारे एकहाती श्रेय लाटले जात आहे", अशी नाराजी काही कार्यकर्त्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर व्यक्त केली.

ठाणे शहरात कळवा, मुंब्रा, कोपरीपासून ते वागळे इस्टेट आणि घोडबंदर परिसरात अशा प्रकारच्या बॅनर्सचा सुकाळ झाला आहे. महापालिका निवडणुका जवळ येत असल्याने राजकीय इच्छुक मंडळी 'सक्रिय असल्याचे' दाखवण्यासाठी नागरी कामांचे श्रेय घेताना दिसत आहेत. मात्र प्रत्यक्षात प्रशासक आणि अधिकारी यांच्या माध्यमातूनच सर्व योजना राबवल्या जात आहेत.

महापालिकेतील सत्ताविरहित कालावधीत नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने अनेक निर्णय घेतले आहेत.

## चालू बिलासह थकबाकी भरण्याचे महावितरणचे आवाहन

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

महावितरणच्या कल्याण परिमंडलात एप्रिल आणि मे या दोन महिन्यात लघुदाब वीज ग्राहकांकडील (कृषिपंप व कायमस्वरुपी वीज खंडित ग्राहक वगळून) वीजबिल थकबाकीत तब्बल २१० कोटी रुपयांची भर पडली आहे. या व्यतिरिक्त मार्च २०२५ अखेरची २५ कोटी २३ लाख रुपयांची थकबाकी तसेच जून महिन्यातील १०८ कोटी ७६ लाख रुपयांची चालू थकबाकी वसुलीचे मोठे आव्हान कर्मचाऱ्यांसमोर आहे. परिणामी थकित वीजबिलाची वसुली अथवा थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याशिवाय पर्याय नाही. वीज खंडितची कटू कारवाई टाळण्यासाठी थकीत व चालू वीजबिल तसेच सुरक्षा ठेवीचा त्वरित भरणा करावा, असे आवाहन कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी केले आहे.

मागील थकबाकी आणि जून महिन्यातील चालू थकीत वीजबिल लक्षात घेता कल्याण परिमंडलातील लघुदाब ग्राहकांकडून ३० जूनपर्यंत ३४४ कोटी रुपये वसूल होणे आवश्यक आहे. यात कल्याण पूर्व आणि पाश्चिम तसेच डोंबिवली विभागाचा समावेश असलेल्या कल्याण मंडल कार्यालय एक अंतर्गत ६० कोटी २६ लाख रुपयांचा समावेश आहे. उल्हासनगर एक आणि दोन, कल्याण ग्रामीण व बदलापूर विभागाचा समावेश असलेल्या कल्याण मंडल दोन अंतर्गत १०६ कोटी ३५ लाख रुपयांच्या वीजबिलाचा समावेश आहे. वसई व विरार विभागाचा समावेश असलेल्या वसई मंडलातील ग्राहकांकडील १२३ कोटी ४३ लाख तर पालघर मंडलातील ग्राहकांकडील ५३ कोटी ९३ लाख रुपयांचा समावेश आहे. त्यामुळे कल्याण परिमंडलात थकीत वीजबिलापोटी वीजपुरवठा खंडित करण्याची मोहिम तीव्र करण्यात आली आहे.

जून अखेरपर्यंत रविवार आणि इतर सुट्टीच्या दिवशीही वीजबिल भरणा केंद्र सुरु ठेवण्यात येणार आहेत. याशिवाय महावितरणचे www.mahadiscom.in हे संकेतस्थळ, ग्राहकांसाठीचे मोबाईल अॅप, विविध पेमेंट वॅलेट आदींच्या माध्यमातून डेबिट/क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग मार्फत वीजबिल ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. या सुविधांचा उपयोग करून थकबाकी, चालू वीजबिल तसेच सुरक्षा ठेवीचा विहित मुदतीत भरणा करून सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी कल्याण परिमंडलातील वीज ग्राहकांना केले आहे.

## ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनमार्फत वर्षभर 'सहकारातून समृद्धी'कार्यक्रम

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

संयुक्त राष्ट्र संघाने २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून जाहिर केले आहे. यानिमित्त ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनमार्फत वर्षभर "सहकारातून समृद्धी" विषयक विविध कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. यात स्वयंपुर्नविकासाला चालना तसेच, गृहनिर्माण व्यवस्थापन व सहकार कायद्याविषयी प्रबोधन आणि डिम्ड कन्व्हेयन्सबाबत चर्चासत्रे जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यात आयोजित केली आहेत. अशी माहिती ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे यांनी दिली.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष - २०२५ च्या निमित्ताने यंदा 'सहकारातून समृद्धी' ही संकल्पना साकार करण्यासाठी ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनने जय्यत तयारी केली आहे. या अनुषंगाने हौसिंग फेडरेशन मार्फत वर्षभर विविध ज्ञान प्रबोधनाचे कार्यक्रम राबविण्याचे ठरवले आहे. यामध्ये यंदा प्रथमच महाविद्यालयीन



विद्यार्थ्यांसाठी ठाण्यातील वेगवेगळ्या महाविद्यालयांत सहकार कायद्याविषयी कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. या कार्यशाळांमध्ये सहकार कायदा सहकार कायद्यातील तरतुदी रोजच्या व्यवहारात सहकार कायद्याचा उपयोग सहकार शिक्षण प्रशिक्षण इत्यादी विषयांबाबत सहकार क्षेत्रातील विविध तज्ञ तसेच, ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष व संचालक विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत.

गृहनिर्माण संस्थांना आणि सोसायटीतील सभासदांना भेडसावणाऱ्या वेगवेगळ्या समस्या तसेच अडचणी आदी विषयांवर मार्गदर्शन व अचूक सोल्युशन गृहनिर्माण संस्थांना मिळावे, यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने सुरू करून दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी "दाद - फिर्याद" हा पारदर्शी जनसंवाद कार्यक्रम हौसिंग फेडरेशनच्या सभागृहात होणार आहे या माध्यमातून गृहनिर्माण संस्थांचे सभासद, पदाधिकारी किंवा तक्रारदार यांना त्यांच्या समस्येविषयी तक्रारदार व ज्यांच्या विषयी तक्रार आहे अशा सर्वांचे समुपदेशन करून योग्य तो सल्ला दिला जाणार आहे. प्रत्येक तालुक्यात स्वयंपुर्नविकास, गृहनिर्माण संस्थांचे व्यवस्थापन आणि मानीव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेयन्स) या विषयांवर चर्चासत्राचे आयोजन करण्यात येईल. गृहनिर्माण संस्थांचा पुर्नविकास, त्याचबरोबर त्याचबरोबर वेगवेगळ्या कारणांनी रखडलेले पुर्नविकास प्रकल्प, स्वयंपूर्णविकासा विषयी समस्या व स्वयंपूर्नविकासासाठीअर्थसाह्य याबाबत मार्गदर्शन केले जाईल. यामध्ये स्वयंपुर्नविकासासाठी कर्जपुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्थाचे पदाधिकारी याविषयी मार्गदर्शन करणार आहेत.

गृहनिर्माण संस्थांच्या व्यवस्थापनाविषयी हौसिंग फेडरेशनचे संचालक आणि मानीव अभिहस्तांतरण प्रक्रियेसाठी जिल्हा उपनिबंधक नागरिकांना मार्गदर्शन करतील. अशी माहिती सीताराम राणे यांनी बोलताना दिली.

> ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनच्या ह्या वर्षभर राबविल्या जाणाऱ्या ज्ञान प्रबोधनाच्या यज्ञात सहभागी होण्यासाठी गृहनिर्माण संस्था व सभासदांनी ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनच्या विलासिनी, शिवाजी पथ ठाणे (प.) या कार्यालयात प्रत्यक्ष अथवा हौसिंग फेडरेशनच्या thanedisthsgfed75@gmail.com या ई मेलवर नोंदणी व आपल्या तक्रारीची आगावु नोंद करावी, असे आवाहन फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे यांनी केले आहे.

## पीओपी गणेश मूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावातच होणार

◆ **भाईंदर (वार्ताहर) :**

पीओपी गणेश मूर्ती तयार करणाऱ्या मूर्तिकारांना व विक्री करणाऱ्यांना मूर्तीवर विशिष्ट चिन्ह ठेवणे बंधनकारक असून त्यांच्या कारखाना व विक्री केंद्रावर पीओपी मूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावातच केले पाहिजे, असे लिहिलेले फलक ठळकपणे दिसतील अशा ठिकाणी ठेवणे बंधनकारक राहणार आहे. मीरा भाईंदर शहरात साधारण २० हजार सार्वजनिक गणेशमूर्तीची स्थापना केली जाते. त्यात १७ हजारांहून अधिक गणेशमूर्ती पीओपीच्या असतात. त्यातील २ ते ३ हजार मूर्तीचेच कृत्रिम तलावात विसर्जन होते. अन्य मूर्ती नैसर्गिक तलाव व खाड्यांमध्येच विसर्जित होत असतात. पीओपी गणेशमूर्तीसंदर्भात उच्च न्यायालय व प्रदूषण नियंत्रण मंडळाने मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्यानुसार या मूर्तीचे नैसर्गिक पाण्यात विसर्जन न करता कृत्रिम तलावातच विसर्जन करावे असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे मीरा भाईंदर महापालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा यांनी पीओपी गणेश मूर्ती तयार करणाऱ्या मूर्तीकारांना व विक्री करणाऱ्यांना मूर्तीवर विशिष्ट चिन्ह ठेवणे बंधनकारक केले असून त्यांच्या कारखाना व विक्री केंद्रावर पीओपी मूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावातच केले पाहिजे, असे लिहिलेले फलक ठळकपणे दिसतील अशा ठिकाणी ठेवणे बंधनकारक केले आहे. मूर्तीकारांना महापालिकेकडून सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच या वर्षी शहरात किमान १८ नैसर्गिक तलाव उभारण्यात येतील अशी माहिती दिली आहे.

### मूर्तीवर विशिष्ट चिन्ह बंधनकारक

### लवकरात लवकर समस्यांचे निवारण करण्याचे अधिकाऱ्यांचे आश्वासन

## सानपाड्यातील समस्या सोडविण्यासाठी भाजपाची पालिकेवर धडक

◆ **नवी मुंबई (वार्ताहर) :**

सानपाडा नोडमधील नागरी समस्या निवारणासाठी व नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी नवी मुंबई महापालिका प्रशासनाकडून टाळाटाळ होत असल्याने भारतीय जनता युवा मोर्चाचे नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष व अखिल भारतीय माथाडी युनियनचे अध्यक्ष पांडुरंग आमले यांनी सानपाड्यातील रहिवाशांसमवेत महापालिका मुख्यालयात जावून संबंधित अधिकाऱ्यांना समस्यांचे गांभीर्य निदर्शनास आणून दिले. लवकरात लवकर या समस्यांचे



निवारण करण्याचे आश्वासन महापालिका अधिकाऱ्यांकडून पांडूरंग आमले व त्यांच्यासमवेत गेलेल्या शिष्टमंडळातील रहिवाशांना देण्यात आले.

सानपाडा सेक्टर १० मधील झाशीची राणी मैदान व सेक्टर ७ मधील सीताराम मास्तर उद्यानाचा गैरवापर करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, सानपाडा सेक्टर ७ मधील सप्तरंग सोसायटी व बाबू गेनू मैदानासमोरील रस्त्यावरील चेम्बर्सची दुरुस्ती करण्यात यावी, पावसाळा सुरु झाला तरीही सानपाडा नोडमधील धोकादायक झाडांची व ठिसूळ झालेल्या फांद्याची छाटणी झालेली नसल्याने जिवितहानी व मालमत्तेची संभाव्य हानी टाळण्यासाठी पालिका प्रशासनाने तातडीने वृक्षछाटणी अभियान राबवावे, सानपाडा सेक्टर ८ मधील पदपथावर अतिक्रमण करुन पदपथ गिळकृंत करणाऱ्या फेरीवाल्यांना तातडीने हटवून स्थानिक रहिवाशांना ये-जा करण्यासाठी हे पदपथ उपलब्ध करुन देण्यात यावे, सेव्हन्थ डे या शाळेसमोर शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळी होत असलेली गर्दी व वाहतूक कोंडी यावर तोडगा काढण्यात यावा, सानपाडा नोडमध्ये गेल्या काही दिवसांपासून तांबूस, पिवळसर व लालसर रंगाचे दूषित पाणी येत असल्याने रहिवाशांच्या जिविताला धोका निर्माण झाला असल्याने या समस्येचे निवारण करुन रहिवाशांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्यात यावा, अशा मागण्या पांडूरंग आमले व शिष्टमंडळातील स्थानिक रहिवाशांनी त्या त्या विभागाच्या उपायुक्तांची भेट घेवून त्यांना लेखी निवेदन सादर करत समस्या निवारणाबाबत त्यांच्याशी चर्चा केली.

पालिका उपायुक्तांनी आमले व त्यांच्यासोबत गेलेल्या शिष्टमंडळाला सकारात्मक प्रतिसाद देत लवकरात लवकर या समस्यांचे निवारण करण्याचे आश्वासन दिले.

## भटक्या कुत्र्याने तोडले चिमुकल्याचे लचके

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

डोंबिवली पश्चिमेत भटक्या कुत्र्यांनी एका ५ वर्षांच्या चिमुरड्यावर हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. आनंद नगर परिसरात मंगळवारी दुपारी हा प्रकार घडला असून हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

मोठागाव रेतीबंदर भागातील एका घरातील चिमुकला खेळण्यासाठी घराबाहेर पडला होता. हा चिमुकला रस्त्यावर येताच त्याच्या बाजुला काही अंतरावर पाच भटके कुत्रे उभे होते. हे भटके कुत्रे काही करणार नाहीत या विचाराने चिमुकला आपल्या घरासमोरील मोकळ्या जागेत आला. त्यावेळी एका कुत्र्याने चिमुकल्याच्या दिशेने धाव घेऊन त्याच्या पायाला चावे घेण्यास सुरूवात केली. चिमुकला जमिनीवर कोसळला. इतर चार भटके कुत्रे मुलाच्या दिशेने धावून आले. त्यांनी जमिनीवर पडलेल्या मुलाच्या पायाला, हाताच्या भागाला चावे घेऊन त्याच्या विजारीला पकडून तोंडाने दोन ते तीन ठिकाणी फरफटत नेले.

डोंबिवलीत भटक्या श्वानांचा उपद्रव वाढत असताना पालिका आरोग्य विभागाकडून या श्वानांवर कोणतीही कारवाई केली जात नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे.

## बेकायदा बांधकाम प्रकरणी दिवा येथील तत्कालीन सहाय्यक आयुक्त निलंबित

**मुंब्रा :** न्यायालयाच्या दणक्यानंतर मुंब्र्याच्या खान कंपाऊंडमधील १७ बेकायदा टॉवर्सवर ठाणे पालिकेने कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. या बांधकामांमधून कोटींची उलाढाल झाली असल्याची माहिती समोर येताच ठाणे महापालिकेच्या भ्रष्टाचाराची पहिली विकेट पडली आहे.

बेकायदा बांधकाम प्रकरणी दिव्याचे तत्कालीन सहाय्यक आयुक्त फारूख शेख यांच्यावर अखेर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. पालिका आयुक्त सौरभ राव यांनी शेख यांचे तडकाफडकी निलंबन केले आहे. दरम्यान, एकीकडे या प्रकरणाची चौकशी सुरू असताना न्यायालयाच्या दणक्यानंतर पालिका आयुक्त 'इन ॲक्शन' झाले आहेत.

# शुभांशूची तिरंगा घेऊन अंतराळात भरारी

आपल्या कुटुंबातील वडील, मुलगा किंवा पती घर सोडून दुसऱ्या शहरात राहायला जातो, तेव्हा कुटुंबातील सदस्यांच्या भावनिकतेला पारावार राहत नाही. त्याचप्रमाणे देशाचा सुपूत्र शुभांशू शुक्ला संशोधनासाठी अंतराळात रवाना झाला. त्याच्या कुटुंबांना जितका अभिमान आहे, तितकाच तो भारतीय असल्याचा गर्व समस्त देशवासीयांना आहे. भारताच्या अंतराळ क्षेत्रात आज हा एक ऐतिहासिक क्षण मानला जातो. देशभर शुभांशूवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला हे अंतराळात गेलेले भारताचे दुसरे अंतराळवीर आहेत. अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांनी त्यांच्या तीन सहकाऱ्यांबरोबर मिळून 'अक्सिसऑम-४' या अंतराळ मोहिमेअंतर्गत आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या दिशेने बुधवारी दुपारी उड्डाण केले. 'ॲक्सिसओम-४'चे हे अंतराळातील चौथे खासगी अभियान आहे. हे नासा आणि स्पेसएक्सचे संयुक्त अभियान आहे. या अंतराळ मोहिमेत चार देशांमधील ४ अंतराळवीरांचा समावेश आहे. भारत, अमेरिका, पोलंड, हंगेरी हे देश आहेत, जे अंतराळवीर या मोहिमेत समाविष्ट आहेत.

नासाच्या फॉल्कन-९ या रॉकेटद्वारे फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरवरून त्यांनी अवकाशात झेप घेतली. ४१ वर्षांनंतर भारतीय व्यक्ती अंतराळात गेल्याचा वेगळा आनंद आहे. याआधी ३ एप्रिल १९८४ रोजी भारताचे अंतराळवीर राकेश शर्मा हे सोव्हिएत संघाच्या मदतीने अवकाश मोहिमेवर गेले होते. आता वायुदलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला अंतराळ मोहिमेवर गेले आहेत. एक वर्षाचे प्रशिक्षण व कठोर मेहनतीनंतर शुक्ला यांची नासाने या मोहिमेसाठी निवड केली आहे. या मोहिमेत अंतराळातील पिकांच्या उगवणीसाठी महत्त्वाचं संशोधन करण्यात येणार आहे. त्यामुळे भारत केंद्रित अंतराळ शेती आणि भविष्यातील अंतराळ संशोधनाच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल मानलं जात आहे. या मोहिमेसाठी ५४८ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात जाणाऱ्या शुभांशू शुक्ला यांना लढाऊ विमान उडवण्याचा अनुभव आहे. या मिशनमध्ये ते मिशन कमांडर असणार आहेत. चाळीस वर्षीय शुभांशू यांचा जन्म लखनऊमध्ये झाला. जून २००६ मध्ये ते भारतीय हवाईदलात दाखल झाले. मार्च २०२४ मध्ये ते ग्रुप कॅप्टन बनले. एक दुर्मीळ योगायोग असा की, राकेश शर्मा यांच्या मोहिमेला ४१ वर्षे झाली आहेत; परंतु ४० वर्षांचे शुभांशू हे राकेश शर्मांनंतर अंतराळात जाणारे दुसरे भारतीय ठरले आहेत. शुभांशू शुक्ला यांनी सु-३०, मिग-२१, मिग-२९, जगुआर, हॉक, डोर्नियर आणि एएन-३२ सह विविध विमानांवर २ हजारांपेक्षा अधिक तास उड्डाण केले आहे. २०१९ मध्ये त्यांनी रशियाच्या गगारिन कॉस्मोनॉट ट्रेनिंग सेंटरमध्ये अंतराळ यात्री म्हणून प्रशिक्षण घेतले. त्यानंतर भारताच्या गगनयान मिशनसाठी त्यांची इस्रोकडून निवड झाली होती.

मोदी-बायडेन करारातून जन्मलेली मोहीम आहे. या मोहिमेची घोषणा जून २०२३ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिकेतील दौऱ्यात झाली होती. यामध्ये इस्रो आणि नासा यांच्यातील सहकार्याने भारतीय अंतराळवीराला अंतराळात पाठवण्याचा निर्णय झाला होता. या अंतराळ मोहिमेसाठी भारताने एक जागा मिळवण्यासाठी ५५० कोटी रुपये ॲक्सिसअम स्पेसला दिले आहेत. हे भारताच्या जागतिक अंतराळ सहकार्याचे प्रतीक आहे. ही मोहीम "मिशन आकाशगंगा" या नावाने ओळखली जाते. यापूर्वी ॲक्सिसओम-४ मोहिमेचे प्रक्षेपण अनेक कारणांमुळे पुढे ढकलण्यात आले होते. पूर्वी निश्चित वेळापत्रकाबद्दल बोलायचे झाले तर ते २९ मे रोजी प्रक्षेपित होणार होते. तथापि, त्यावेळी ते पुढे ढकलण्यात आले आणि नंतर ते ८ जून, १० जून आणि ११ जून रोजी पुढे ढकलावे लागले. अखेर, दीर्घ प्रतीक्षेनंतर, ते २५ जून रोजी प्रक्षेपित करण्यात आले. दोन आठवड्यांच्या या मोहिमेचे नेतृत्व माजी अंतराळवीर पेगी व्हिटसन करत आहेत. या मोहिमेत एकूण ६० वैज्ञानिक प्रयोग करण्यात येणार असून, त्यापैकी ७ प्रयोग भारतातील संशोधकांनी सुचवले आहेत. ज्यात मूग आणि मेथीची लागवड करण्याचा समावेश आहे. पृथ्वीवर करोडो लोकांना त्रस्त करणाऱ्या डायबेटिस अर्थात, मधुमेहावरील उपचारात क्रांती घडवण्यासाठी आता अंतराळाची मदत घेतली जात आहे. ॲक्सिसअम-४ मोहिमेतील अंतराळवीर आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर अत्यल्प गुरुत्वाकर्षणाच्या स्थितीत इन्सुलिनवर अभ्यास करणार आहेत. या संशोधनामुळे मधुमेहींसाठी अधिक प्रभावी आणि स्थिर इन्सुलिन तयार करण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. पृथ्वीवर इन्सुलिनचे रेणू एकत्र येऊन गुठळ्या तयार होतात, ज्यामुळे त्याची परिणामकारकता कमी होते. इन्सुलिन पंपांसारख्या उपकरणांमध्ये यामुळे अडथळे निर्माण होतात. मात्र, अंतराळातील मायक्रोग्रॅव्हिटीच्या वातावरणात ही प्रक्रिया अत्यंत मंदावते. यामुळे शास्त्रज्ञांना इन्सुलिनच्या रेणूंची गुठळी तयार होण्याच्या प्रक्रियेचे अधिक सखोल विश्लेषण करण्याची संधी मिळणार आहे. या मोहिमेतील अंतराळवीर या प्रक्रियेचा अभ्यास करून असा डेटा गोळा केला जाईल. ज्याच्या मदतीने पृथ्वीवर अधिक स्थिर आणि जास्त काळ टिकणारे इन्सुलिन विकसित करता येईल, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. हे संशोधन यशस्वी झाल्यास, ते केवळ इन्सुलिनची परिणामकारकता वाढवणार नाही, तर मधुमेहावरील उपचारांचा खर्च कमी करण्यासही मदत होणार आहे.

"माझ्याबरोबर, माझ्या खांद्यावर आपला तिरंगा आहे. हा तिरंगा मला सांगतोय की, मी या प्रवासात एकटा नाही. मी तुम्हा सर्वांबरोबर इथे आहे", ही शुभांशू शुक्लाची इन्स्टाग्रामवरची पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत असून, शुभांशूच्या देशप्रेमाचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे.

# युद्ध सरले, विजय कोणाचा?



गेल्या १२ दिवसांपासूनच्या इराक-इस्रायल युद्धावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धबंदी झाल्याचे जाहीर केले. अर्थात त्यानंतरही दोन्ही राष्ट्रांनी एकमेकांवर हल्ला केला. इराणचे अणुबॉम्ब नष्ट झाल्यामुळे युद्धबंदी करण्यात काहीच अडचण नाही, असे समजून इस्रायलनेही युद्धबंदी करण्यास संमती दिली. युद्धबंदी झाली की नाही, हा वादाचा मुद्दा असला, तरी या युद्धात नुकसान, फायदा कोणाचा झाला, हे नीट उमगले नाही.

**अजय तिवारी**

इस्रायलने १३ जूनच्या रात्री इराणवर अचानक हवाई हल्ला केला. त्यामुळे पश्चिम आशियात एक नवे युद्ध सुरू झाले. या एकाच हल्ल्यामुळे अणुयुद्धाच्या भीतीने त्रस्त असलेल्या शत्रूंमधील संघर्ष टोकाला पोहोचला. त्यात दोन्ही देशांनी एकमेकांवर प्राणघातक हल्ले केले. सुरुवातीच्या संघर्षात कोणीही मागे हटण्यास तयार नव्हते. या युद्धाने १२ दिवसांमध्ये आगीचा वर्षाव केला. त्यात फक्त रॉकेटचा पाऊस, क्षेपणास्त्रांचा नाश, नागरिकांच्या किंकाळ्या आणि लष्करी तळांची राख उरली. इराणने इस्रायलच्या तेल अवीवसारख्या प्रमुख शहरांना लक्ष्य केले, तर इस्रायलने इराणी कमांड आणि अणू संरचना नष्ट करण्यात आपली सर्व शक्ती पणाला लावली. इराणच्या तीन अणुभट्ट्यांवरील अमेरिकेच्या हल्ल्यानंतर, इराणने कतारमधील अमेरिकन तळाला लक्ष्य केले. दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांदरम्यान युद्धबंदीची घोषणा केली. युद्धबंदीची बातमी आल्यानंतर या संपूर्ण संघर्षात कोणत्या देशाचे किती नुकसान झाले हे तपासले जात आहे. या युद्धाने पश्चिम आशियातील राजकारण आणि सुरक्षिततेला हादरवून टाकले. दोन्ही देशांमधील हा संघर्ष एक सामान्य संघर्ष नव्हता. या युद्धात दोन्ही देशांनी आपल्याकडील सर्वात घातक शस्त्रांचा वापर केला. त्यामुळे दोन्ही देशांमध्ये प्रचंड विनाश झाला. हे युद्ध केवळ क्षेपणास्त्रे आणि ड्रोनपुरते मर्यादित नव्हते, तर सायबर हल्लेही झाले. अणू तळ आणि लष्करी तळांवर हल्ले झाले. या युद्धात इराणचे सर्वात मोठे नुकसान झाले.

१३ जून रोजी इस्रायलने 'रायझिंग लायन' नावाच्या गुप्त मोहिमेंतर्गत इराणच्या अनेक महत्त्वाच्या लष्करी आणि अणू तळांना लक्ष्य केले. त्यात किमान २०० हून अधिक इराणी सैनिक, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ आणि वरिष्ठ 'रिव्होल्युशनरी गार्ड' अधिकारी मारले गेले. यात काही ज्येष्ठ शास्त्रज्ञांचाही मृत्यू झाला. याशिवाय अनेक तळ उद्ध्वस्त झाले. वॉशिंग्टन येथील मानवाधिकार कार्यकर्त्यांच्या गटाने संपूर्ण इराणचे आकडे सादर केले आहेत. त्यांनी सांगितले की, मृतांमध्ये ३८० नागरिक तर सुरक्षा दलाचे २५३ कर्मचारी आहेत. इराणच्या आरोग्य मंत्रालयाने सांगितले की, इस्रायली हल्ल्यात सुमारे ४०० इराणी नागरिक मारले गेले आणि ३०५६ जण जखमी झाले. इस्रायली हल्ल्यात इराणचे अनेक लष्करी कमांडर, अणुशास्त्रज्ञ, नागरिक आणि आयआरजीसी प्रमुख मारले गेले. एक लाखांहून अधिक लोक तेहरानहून उत्तरेकडे पळून गेले. युद्धापूर्वी इराणची अर्थव्यवस्था ३.५ टक्के वाढीने चालत होती. जागतिक नाणेनिधी आणि 'ऑक्सफर्ड इकॉनॉमिक्स'ने युद्धामुळे ही वाढ ०.३ टक्क्यांपर्यंत घसरली, असे म्हटले. इराणच्या अर्थव्यवस्थेचा ६० टक्के भाग तेल आणि वायू निर्यातीतून येतो. बारा दिवसांच्या हल्ल्यात तीन प्रमुख तेल शुद्धीकरण कारखाने आणि पाइपलाइन्सचे नुकसान झाले. उत्पादन सुमारे ३५ टक्क्यांनी कमी झाले आणि सुमारे दहा अब्ज डॉलर्सचे निर्यात नुकसान झाले.

इराणने इस्रायलवर हजारो प्राणघातक हल्ले केले. यापैकी बहुतेक इस्रायलच्या मजबूत हवाई संरक्षण प्रणाली आयर्न डोम, डेव्हिड्स स्लिंग आणि एरो सिस्टीमने हवेतच नष्ट केले. तथापि, काही क्षेपणास्त्रे आणि ड्रोन निवासी भागात पडल्याने इस्रायलचेही लक्षणीय नुकसान झाले. रुग्णालये, निवासी इमारती, संरक्षण मंत्रालय, पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले. त्यात हजारो लोक तात्पुरते बेघर झाले. त्याच वेळी इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे इस्रायलच्या 'वेझमन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'चे मोठे नुकसान झाले आहे. हा इस्रायलसाठी एक मोठा धक्का मानला जात आहे. कारण येथे इस्रायलच्या अनेक मोठ्या प्रयोगशाळा होत्या. तिथे महत्त्वाचे संशोधक काम करत होते. इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्यात इस्रायलमध्ये सुमारे २५ ते ३० लोकांचा मृत्यू झाला. तेल अवीव आणि हैफामध्ये एकूण २४ लोकांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली. इराणी हल्ल्यात इस्रायलमध्ये २०० हून अधिक लोक जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार इस्रायलने युद्धकाळात दररोज ७२५ दशलक्ष डॉलर्स खर्च केले. हे एक अत्यंत महागडे युद्ध ठरले. हा संघर्ष आणखी काही दिवस चालू राहिला असता तर एकूण खर्च दरमहा १२ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला असता. याखेरीज इस्रायलमध्ये निवासी इमारती, संरक्षण मंत्रालय, पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले, हजारो लोक बेघर झाले. तेल शुद्धीकरण कारखाने, बंदरे, विमानतळ आणि गॅस क्षेत्रे प्रभावित झाली. उत्पादन, प्रवास आणि व्यापार ठप्प झाला.

युद्ध संपत असताना इराणने कतारमधील अमेरिकेच्या अल-उदेद या लष्करी तळावर क्षेपणास्त्र हल्ला करून संपूर्ण जगाला आश्चर्यचकित केले. अमेरिकेने इराणच्या फोर्डो, नतान्झ आणि इस्फहान येथील अणू तळांवर केलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने हा हल्ला केला; पण इराणने कतार आणि अमेरिकेला या हल्ल्याची आगाऊ माहिती दिली होती, असे नंतर सांगण्यात आले. त्यामुळे हा कोणत्या प्रकारचा हल्ला होता, असा प्रश्न निर्माण होतो. कतारमधील अमेरिकन हवाई तळावर इराणचा हल्ला केवळ प्रतिकात्मक होता. जीवित आणि मालमत्तेचे कमीत कमी नुकसान व्हावे म्हणून ही माहिती आगाऊ देण्यात आली होती. परिणामी, इराणची बहुतेक क्षेपणास्त्रे नष्ट झाली आणि त्यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर सूड उगवण्यासाठी इराणने हा हल्ला केला होता. याची पुष्टी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. त्यांनी 'ट्रुथ सोशल'वर केलेल्या पोस्टमध्ये 'इराणचा प्रतिसाद 'कमकुवत आणि अपेक्षित' होता आणि आशा आहे की आता यापुढे द्वेष निर्माण होणार नाही', असे म्हटले. शिवाय आधीच हल्ल्याची माहिती दिल्याबद्दल ट्रम्प यांनी इराणचे आभार मानले. त्यामुळे एकही जीवितहानी झाली नाही आणि कोणीही जखमी झाले नाही. कदाचित आता इराण या प्रदेशात शांतता आणि सौहार्दाकडे वाटचाल करू शकेल आणि मी इस्रायलला शांततेचा मार्ग अवलंबण्यास सांगू शकेन, असे ते म्हणाले.

काही तासांनंतर ट्रम्प यांनी दुसऱ्या पोस्टमध्ये इराण आणि इस्रायल पूर्ण आणि कायमस्वरूपी युद्धबंदीवर सहमत झाले आहेत. पुढील सहा तासांत ती लागू होईल, अशी घोषणा केली, पण ट्रम्प यांचा हा दावाही आतापर्यंत खोटा ठरला आहे. इराण आणि इस्रायलमध्ये भयंकर युद्ध सुरू आहे. अमेरिकेने २२ जून रोजी इराणच्या अणू तळांवर हल्ला केला आणि हा 'एकदाचा हल्ला' असल्याचे आधीच सांगितले होते. त्यानंतर प्रत्युत्तर देण्यासाठी इराणवर दबाव होता. हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून कतारमधील अमेरिकन तळावर हल्ला करतानाही इराणला मोठे युद्ध नको होते, कारण त्याची अर्थव्यवस्था आधीच कमकुवत झाली आहे. म्हणूनच इराणने कतारमधील अल-उदेइद तळावर लक्ष्य केले. तिथे अमेरिकन लष्कराच्या सेंट्रल कमांडचे मुख्यालय आहे. कतारमध्ये हल्ला करण्यामागील आणखी एक कारण म्हणजे इराण आणि कतार यांच्यात चांगले संबंध आहेत. कतारने या भागात तटस्थ मध्यस्थाची भूमिका बजावली आहे. इस्रायल आणि हमास यांच्यातील चर्चेत कतारचीच मध्यस्थी यशस्वी झाली होती. हल्ल्यापूर्वी इराणने कतारला माहिती दिली. त्यानंतर कतारने त्याचे हवाई क्षेत्र बंद केले. अमेरिकेने गेल्या एका आठवड्यात अल-उदेइदवरून आपली बहुतेक विमाने हटवली. १९ जूनपर्यंत तिथे फक्त पाच अमेरिकन विमाने उरली होती. यावरून या हल्ल्यामागे मोठे नुकसान करण्यापेक्षा आपली ताकद दाखवणे हा इराणचा उद्देश होता, हे स्पष्ट होते. त्यामुळे कधी गंभीर तर कधी लुटुपुटुचे वाटणारे हे युद्ध आटोक्यात आल्याचे दिसत आहे, मात्र त्यातून खरेच काही साध्य झाले का, हा प्रश्न उरतो. विशेषतः इराणने अमेरिकेच्या हल्ल्यापूर्वी आपले समृद्ध युरेनियम हलवल्याचे म्हटले गेल्याने वास्तव गुलदस्त्यातच राहिले.

# कोकणात 'कोकण सुवास'चा दरवळ...!

**माझे कोकण**



**संतोष वायंगणकर**

कोकणात सध्या भातशेतीचा हंगाम सुरू आहे. पूर्वी कोकणातील सर्वच गावातून भातशेती मोठ्या प्रमाणावर केली जायची. अखंड कोकण भातशेतीने बहरलेलं हिरव कोकण होतं, परंतु गेल्या काही वर्षांमध्ये भातशेती कोकणातील शेतकऱ्यांनी कमी केली. शेतकऱ्यांना भातशेतीत कामगारही मिळेनासे झालेत. यामुळे साहजिकच भातशेतीचं क्षेत्र कमी झालं. काही शेतकऱ्यांनी ज्या ठिकाणी माळरान जमीन होती त्याठिकाणी आंबा, काजू, रतांबा लागवड करण्यात आली. यामुळे मधल्या काही वर्षांत भातशेती किफायतशीर होत नाही. यामुळे भातशेतीकडे दुर्लक्ष होत गेलं. पारंपरिक पद्धतीने भातशेती केली जात असल्याने त्याकाळी भातशेतीतून जेमतेम कुटुंबांचा वर्षभर पुरणारा तांदूळ मिळायचा; परंतु या भातशेतीत घ्यावे लागणारे कष्ट हे अफाट आहेत. मेहनतीच्या तुलनेत शेतकऱ्याला काही मिळत नाही याचा हिशोब जेव्हा शेतकरी मांडू लागला तेव्हा निश्चितच त्याला कळून चुकले की भातशेती किफायतशीर होत नाही; परंतु वडिलोपार्जित शेती असल्याने अनेक गावातून शेतकरी शेती करीत होता. त्यातही पारंपरिक भात बियाण्यांचा वापर जास्त होत होता; परंतु अलीकडे मात्र नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून नव्याने बाजारात आलेल्या बियाण्यांचा वापर करीत भात उत्पादन घेतले जात आहे.

पूर्वी कोकणकृषी विद्यापीठाने विशेष करून काजूच्या अनेक जातींची निर्मिती केली. वेंगुर्ले-७ या काजू 'बी'च उत्पन्न शेतकऱ्याला चांगलंच फायदेशीर ठरत आहे. कोकणकृषी विद्यापीठाने काही काजूच्या विकसित केलेल्या जाती आहेत. त्यामुळे काजू उत्पादनात निश्चितपणे कोकणात मोठी वाढ झाली. भाताच्या बाबतीतही कोकण कृषी विद्यापीठाकडून प्रयत्न होतात. शेतकऱ्याचे आर्थिक स्त्रोत वाढावेत हाच त्यामागचा हेतू आहे. कोकणकृषी विद्यापीठ विविध फळांच्या बाबतीत नवनवीन प्रयोग केले जात आहेत. भाताच्या बाबतीतही रत्नागिरी आठ, रत्नागिरी २४ अशा भाताच्या नवीन जाती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविल्या जातात. कोकणकृषी विद्यापीठाच्या रत्नागिरी जवळील शिरगाव संशोधन केंद्रात कोकणसाठी एक, वेगळे भाताचे वाण विकसित करण्यात आले आहे. 'कोकण सुवास' असे या नव्या भाताच्या वाणाचे नाव आहे. कृषी विद्यापीठाच्या शिरगाव-रत्नागिरी येथील संशोधन केंद्रात या कोकण सुवास या वाणाला निर्मितीसाठी तब्बल दहा वर्षांचा कालावधी लागला आहे. २०१५ पासून शेती संशोधन केंद्रात या भात बियाण्यावर अभ्यास सुरू होता. तब्बल १० वर्षांच्या प्रयत्नानंतर विद्यापीठाने कोकण सुवास हे वाण निर्माण केले. या भाताला सौम्य सुवास येतो. बासमतीवर संशोधन केंद्रात गॅमा किरणांची प्रक्रिया करण्यात आली. यातूनच ही सुवासिक जात निर्माण करण्यात आली.



कोकण सुवासची ही हळवी जात आहे. ११५ ते १२० दिवस हा कोकण सुवास भात तयार व्हायला जातात. विशेष म्हणजे कोकण सुवासच्या या वाणाला महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठांच्या संयुक्त कृषी समितीने मान्यताही दिली आहे. पूर्वी कोकण हे भाताचं आगर मानलं जायचं. पूर्वीच्या काळी पूर्णपणे भातशेती शेणखत, पालापाचोळा या सेंद्रिय खतावरची होती. रासायनिक खतांचा वापर नव्हता. यामुळे त्या काळच्या पिकांनाही महत्त्व होतं. मधल्या काळात जरी भात शेतीकडे दुर्लक्ष होतं गेलं असलं तरीही अलीकडे नव-नवीन जास्त उत्पादन देणारी बियाणी शेती क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर नवी पिढी करू लागली. काही तरुण गावांमध्ये भातशेती करताना दिसतात. कोकणातील तरुण शेतात जातच नाही. तरुणांना कष्टच करायला नको असा जो काही एक गैरसमज पसरविला गेला आहे. त्याला छेद देण्याचे काम आजचा तरुण काही गावांमधून शेतीत प्रयोगशीलता आणून दाखवत आहे. भात उत्पादन अधिकाधिक घेऊन उत्पन्न वाढविण्याचे त्यांचे प्रयत्न आहेत. कोकण हे फळपिकाबरोबरच भातशेतीला आवश्यक असणारी सकसता इथल्या मातीत आहे. रायगड जिल्ह्यात तर फार पूर्वीपासून सर्वाधिक भात पिकवला जातो. फार पूर्वीपासून रायगड जिल्हा हा भातशेतीसाठी प्रसिद्धच आहे. भातशेतीतून मिळणाऱ्या उत्पादनातून शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह व्हायचा. भरपूर शेती करायची, भाताच विक्रमी उत्पादन घ्यायची वेळ पडली तर यावर्षी पिकवलेलं भात पुढच्या वर्षाला देखील पुरेल अशा पद्धतीच नियोजन असायचे. प्रत्येकाच्या घरात, कुटुंबात पुरेसा तांदूळ असायचा. त्यामुळे कोकणातील शेतकरी समाधानी वृत्तीने जीवनाची वाटचाल करणारा श्रीमंत मनाचा शेतकरी नेहमीच आनंदीच असतो. कोकणकृषी विद्यापीठाच्या या नव्या भाताच्या संशोधनाचा निश्चितच चांगला परिणाम दिसून येईल. आजही ज्या कुटुंबातून भातशेती केली जाते त्या कुटुंबासाठी 'कोकण सुवास' हे भाताचं नवीन वाण निश्चितच कोकणवासीयांच्या जेवणाच्या ताटातील लज्जत वाढविणारीच आहे. मात्र, या सर्व नवीन तंत्रज्ञान, संकरीत भात बियाण्यांची निर्मिती असं सर्वच नवनवीन काही होत असताना कोकणात भातशेतीच क्षेत्र आणखी वाढल पाहिजे हे खरं आहे. मात्र, या भातशेतीच्या बाबतीतही माकड, गवारेडा, रानडुक्कर या वन्य प्राण्यांकडूनही तितकाच आणि तसाच त्रास होताना दिसतो. वन्यप्राण्यांच्या एका एट्रीने सारं काही होत्याचं नव्हतं होतं. यामुळे देखील शेतकरी हवालदिल आहेत आणि नाराजही आहेत. एकदा शेतात हे वन्य प्राणी आले की शेतकऱ्याची अपार मेहनत आणि कष्टावर पाणी फेरण्याचे काम हे वन्यप्राणी करताना दिसतात. यातच परत निसर्गाचं ऋतुचक्रदेखील विचित्रपणे सुरू आहे. कधीही पाऊस कोसळतो. कडक उन्हाळा येतो. यामुळे कशाचं काहीही खरं नाही. सारीच अस्थिरता याच अस्थिरतेमुळे कोकणातील शेतकरी शेती क्षेत्राकडे वळतानाही विचार करतो. कोकण भविष्यात 'कोकण सुवास' ने दरवळेल अशी आजच्या घडीला अपेक्षा करायला काहीच हरकत नाही.

## राशिभविष्य

गुरुवार, २६ जून २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती आषाढ शुद्ध प्रदीपदा. शके १९४७, चंद्रनक्षत्र आर्द्रा योग ध्रुव, चंद्र राशी मिथुन गुरुवार दिनांक २६ जून २०२५. सूर्योदय ६.०२, सूर्यास्त ७.१९, चंद्रोदय ६.३७, चंद्रास्त ८.३०, राहू काळ २.२० ते ४.००, चंद्रदर्शन, महाकवी कालिदास दिन, छत्रपती शाहूमहाराज जयंती, आषाढ मासारंभ, श्री टेंभे स्वामी महाराज पुण्यतिथी.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : आपल्या कार्यक्षेत्रात सुसंधी लाभणार आहे.

**वृषभ** : आपले धार्मिक प्रवास होण्याची शक्यता आहे.

**मिथुन** : कामाकडे लक्ष केंद्रित करणे चांगले.

**कर्क** : मनोबल वाढवा.

**सिंह** : नवीन संधी आपणासाठी चांगल्या असतील.

**कन्या** : कौटुंबिक सौख्य लाभणार आहे.

**तूळ** : अपेक्षित गाठी-भेटी होणार आहेत.

**वृश्चिक** : आर्थिक फायदे होणार आहेत.

**धनू** : व्यवसायातील महत्त्वाचे निर्णय आपण घेऊ शकता.

**मकर** : संयम राखणे जरुरी आहे.

**कुंभ** : आपणास मोठा भाऊ किंवा वडील यांची मदत होणार आहे.

**मीन** : कार्यक्षेत्रामध्ये बुद्धी आणि हुशारीने पुढे येणार आहात.

## जनसंवाद

### मी झाड बोलतोय...



मी पिंपळाचे झाड बोलतोय. अनेक वर्षांपासून भांडुप पश्चिम येथील खोत रोडवर मनपा मधुबन उद्यानाच्या परिसरात उभा होतो. पण माझा कुणालाही त्रास नव्हता तरीसुद्धा मला मारण्यात आलं. कुणाला तरी खूश करण्यासाठी माझ्यासारख्या अनेक झाडांना मारलं जातं, जसा इतरांना जगण्याचा अधिकार आहे तसा अधिकार मला नाही का? झाडांना मारणं हा जरी कायद्याने गुन्हा असला तरीसुद्धा विकासाच्या नावाखाली मुंबई, महाराष्ट्रातील अनेक झाडांना मारून टाकलं. त्यात दुर्दैवाने माझा सुद्धा नंबर लागला. परंतु माझ्यासारख्या अनेक झाडांवर प्रेम करणाऱ्यांनी आमच्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला, उठवत आहे आणि भविष्यात सुद्धा उडवतील असा प्रचंड विश्वास मला आहे. आजपर्यंत आम्ही झाडांनी कुणालाही काही दिलं असेल तर ऑक्सिजनच दिलं तरीसुद्धा आम्हाला मारण्यात आलं. लोकांनी स्वतःच्या स्वार्थासाठी अनेक झाडांना मारलं; परंतु मी कुठे ना? कुठे तरी मी पुन्हा येईन. फक्त माझी जागा बदलीन. पण माझ्या लेकरांना मी पुन्हा ऑक्सिजन देईन.

– **गणेश वराडे,** भांडुप

### ज्ञान मार्गाचे प्रभावी माध्यम भाषा

सरकारने इयत्ता पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदीची सक्ती करणारा अद्यादेश काढला आहे. त्या विरुद्ध अनेक विरोधी प्रतिक्रिया आल्या. अभिवक्ता असीम सरोदे यांनी हिंदी भाषा सक्तीच्या सरकारी नियमांविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या प्रतिक्रिया पाहिल्यानंतर विरोधासाठी विरोध होत असल्याचे लक्षात येते. आपण त्यांना हिंदी भाषा शिकू, बोलू नका असे सांगत नाही आणि सांगितले तरी ती मुले ऐकणार नाही कारण त्यांना इतर मुलांबरोबर खेळायचे असते. बोलीभाषा ही सदोष असते पण जेव्हा आपण एखादी भाषा शाळेत शिकतो तेव्हा ती दोष मुक्त असते. कारण आपण भाषेचे सर्व नियम, व्याकरण समजून घेऊन शिकतो. आपल्याला जर ज्ञान मिळवायचे असेल तर भाषा शिकणे आवश्यक आहे. आपण ज्या प्रदेशात राहतो तिथल्या राज्यभाषेला दुय्यम स्थान देणे हे चुकीचे आहे. सर्वांनी सर्व भाषेचा मानसन्मान ठेवलाच पाहिजे. सरकारच्या ह्या निर्णयाचा सारासार विचार करून सुयोग्य व सर्व सामान्य मंजूर होईल असा पर्याय देणे गरजेचे आहे.

– **लीना गाडगीळ,** पनवेल

### रेल्वेची भाडेवाढ अन् प्रवासी...

भारतीय रेल्वे येत्या १ जुलैपासून रेल्वे तिकिटांच्या किमतीत वाढ करणार आहे. रेल्वे प्रशासनानुसार ही भाडेवाढ किरकोळ असून नॉन-एसी मेल, एक्स्प्रेस गाड्यांचे भाडे प्रति किमी १ पैशाने वाढणार आहे, तर एसी गाड्यांचे भाडे प्रति किमी २ पैशांनी वाढेल. उपनगरीय प्रवास भाड्यात तसेच मासिक सीझन तिकिटाच्या दरात कोणतीही वाढ नाही. दुसऱ्या वर्गाच्या प्रवासासाठी ५०० किलोमीटरपर्यंत कोणतीही भाडेवाढ नाही. मात्र ५०० किलोमीटर पेक्षा जास्त अंतराच्या प्रवासासाठी प्रति किलोमीटर ०.५ पैसे भाडेवाढ लागू होईल. या भाडेवाढीमुळे रेल्वेच्या महसुलात अंदाजे १६०० कोटी रुपयांची वाढ होणार आहे. ज्येष्ठ नागरिकांची रेल्वे तिकिटांची सवलत काढून टाकण्यात आली. भारतीय रेल्वे आता पूर्ण क्षमतेने रुळावर आली असल्यामुळे ही सवलत पुन्हा लागू करावी, अशी मागणी देशातील ज्येष्ठ नागरिकांकडून होत आहे.

– **प्रदीप अनुसया शंकर मोरे,** अंधेरी

### क्रिकेटमध्ये 'गेम' होऊ शकतो

क्रिकेटमध्ये कधी कोणाचा 'गेम' होईल हे सांगता येत नाही. पहिल्या डावात तीन शतकं, दुसऱ्या डावात दोन तरीही सामन्यात हार होणं विश्वास बसण्यासारखं नाही. भारताने पहिल्या दिवसापासून सामन्यावर 'पकड' बसविण्यास सुरू केले. जडेजा, जयस्वालने झेल 'सोडण्याचे' पहिल्या डावात आपले शेवटचे पाच फलंदाज केवळ तीस धावाच करत असताना प्रतिस्पर्धी संघाची तळातील फलंदाजी १९० धावा जमवून गेली. त्यामुळे भारत निर्णायक आघाडी मिळवू शकला नाही. दुसऱ्या डावातही तीच गत. ऊर फुटेस्तोवर गोलंदाजी करून पाच विकेट्स घेणाऱ्या बुमराहला तोलामोलाची साथ लाभली नाही. सढळ हस्ते धावा देण्यात प्रसिद्ध असलेला कृष्णा, सिराज, कर्णधाराच्या विस्मरणात गेलेला शार्दूल सातत्याने प्रभावी मारा करू शकले नाही. डकेट आणि क्रॉली या जोडीने ३७१ धावांचे लक्ष्य धूर्तपणे साध्य करताना ते बुमराहच्या वाट्याला गेले नाही. नेहमीप्रमाणे पाय रोवले आणि स्मिथच्या मदतीने विजय साकारला. शुभमनची सुरुवात अशुभ झाली म्हणून त्याने निराश होण्याचे कारण नाही. मात्र क्षेत्ररक्षण आणि गोलंदाजी याबाबत भारताला विशेष लक्ष द्यावेच लागेल.

– **हेमंतकुमार मेस्त्री,** मनोर

### वर्षा सहली वीकेंडला नसाव्यात

रविवार व शनिवारमध्ये गड किल्ल्यांवर जाणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याने पर्यटकांच्या सुरक्षेसाठी वन विभागाने बऱ्याच ठिकाणी प्रवेशबंदी केली. मुसळधार पावसात गडांवर प्रचंड गर्दी होत असल्याने अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. वन विभागाने पर्यटकांच्या सुरक्षेसाठी कडक नियम केलेत. त्या नियमांचे पर्यटकांनी हुज्जत न घालता पालन करावे. पर्यटकांनी आपल्या सहली कमी गर्दीत व सुरक्षित करायच्या असल्यास आठवड्याच्या मधल्या दिवशी केल्यास निसर्गाचा जास्त आनंद घेता येईल. धोकादायक ठिकाणी सेल्फी व रिल्स काढणाऱ्यांवर कडक करवाई करावी. राज्य सरकारने पर्यटन ठिकाणी पोलिसांची संख्या वाढवावी.

– **विवेक तवटे,** कळवा

### भारताच्या शिक्षणावर जागतिक मोहोर

जागतिक स्तरावर भारताच्या शैक्षणिक क्षेत्राने केलेली कामगिरी ही अभूतपूर्व अशीच म्हणावी लागेल. जगभरातील मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये भारतातील ५४ संस्थांचा नुकताच समावेश झाला. हे यश नव्या शैक्षणिक धोरणाचे, कौशल्य विकासाच्या दिशेने घेतलेल्या दूरदृष्टीपूर्वक निर्णयांचेच आहे. जागतिक स्तरावर भारताच्या शैक्षणिक क्षेत्राने केलेली कामगिरी ही अभूतपूर्व अशीच म्हणावी लागेल. जगभरात मान्यताप्राप्त 'क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२५'मध्ये यंदा भारतातील तब्बल ५४ शैक्षणिक संस्थांचा समावेश झाला आहे. हे केवळ संख्यात्मक नाही, तर गुणवत्तेच्या दृष्टीने मोलाचे यश मानले पाहिजे. आठ भारतीय संस्था यंदा प्रथमच या क्रमवारीत सहभागी झाल्या. हे यश केवळ त्या संस्थांचे नसून, ते भारताच्या नव्या शैक्षणिक धोरणाचे फलित आहे.

– **राजू जाधव,** मांगूर जि. बेळगांव






# महर्षी भृगू



भारतीय ऋषी

डॉ. अनुराधा कुलकर्णी

भृगुसंहितेत भृगूंऋषींनी आपल्या त्रिकालज्ञानाच्या बळावर पुढच्या अनेक पिढ्यांचे भूत भविष्य लिहून ठेवले आहे. भृगू व त्यांचा पुत्र शुक्र यांच्या संवादातून जिज्ञासूंना आपली कुंडली शोधून आपले भूतभविष्य समजते. तैत्तिरिय उपनिषदात भृगुविद्येचे विवरण आहे. त्यास भृगुवल्ली असेही म्हणतात. वरुणाने भृगूला शिकविलेल्या या विद्येस वारुणीविद्या असेही म्हणतात. यात ब्रह्म म्हणजे काय, अन्न, प्राण, मन, विद्यान यात ब्रह्माचे लक्षण असूनही आनंद हेच खरे ब्रह्माचे स्वरूप असे भृगुंना ज्ञान होते, असे वर्णन आहे.

भृगूंची पहिली पत्नी हिरण्यकश्यपुची मुलगी दिव्या होय. हिचा मोठा पुत्र काव्यशुक्र. हे खगोल ज्योतिषी व यज्ञकर्मकांडाचे विद्वान होते. ते राक्षसांचे गुरु झाले. त्यांची कन्या देवयानी ही ययाती राजाची भार्या होती. दुसरा पुत्र विश्वकर्मा हे निपुण शिल्पकार होते. तेच मय नावाने जाणले जातात. भृगूंची दुसरी पत्नी गौतमी ही दानवांचे अधिपती पुलोम ऋषींची कन्या. हिचा मोठा पुत्र च्यवन. यांचा विवाह गुजरातचा राजा शर्यतीची मुलगी सुकन्याशी झाला. च्यवन ऋषी खंबायतच्या खाडीचे राजा बनले व या भागास भृगुकच्छ नाव मिळाले. गौतमीचा दुसरा पुत्र ऋचीकचा विवाह कान्यकुब्जपती कौशिक राजा गाधीची कन्या सत्यवतीसह एक हजार श्यामकर्ण इराणी घोडे कौशिकराजास देऊन झाला. ऋचीकने स्वतःला आणि आपले श्वसुर गाधीराजा यांना तेजस्वी पुत्र होण्यासाठी दोन चरू (यज्ञप्रसाद) तयार केले आणि ते आपली धर्मपत्नी सत्यवती हिच्याजवळ दिले आणि सांगितले की तुझ्यासाठी दिलेल्या चरुने तुला ब्रह्मनिष्ठ श्रेष्ठ पुत्र होईल व तुझ्या मातेसाठी दिलेल्या चरुने तिला क्षात्रतेजाने युक्त असा पुत्र होईल. दैववशात या चरुंची अदलाबदल झाली. सत्यवतीच्या मातेच्या पोटी जमदग्नी आले व सत्यवतीला विश्वामित्र झाले. या विवाहांमुळे भार्गवांचा संबंध हिमालयाच्या दक्षिणेशी आला. ऋचीकचे पुत्र जमदग्नींची पत्नी प्रसेनजित राजाची कन्या रेणुका होय व जमदग्नींचे पुत्र परशुराम होत.भृगू हे मानवांचे प्राचीन पूर्वज आहेत. भृगू अग्निपूजेचे प्रवर्तक असल्याने ऋग्वेदात त्यांचा अंगिरस, नवग्व आणि अथर्वण यांच्याशी संबंध जोडलेला आहे. कुशद्वीप, शाल्मलिद्विप व क्रौंचद्विप हे भृगुंचे कार्यक्षेत्र होय. तेथून ते भारतात आले. यांच्या कुलात कवी, च्यवन, शुक्र, और्व, प्रमती, ऋचीक, जमदग्नी, परशुराम, शौनक इ. प्रसिद्ध व्यक्ती होऊन गेल्या. या सर्वांना भार्गव म्हणतात. भार्गवांचा ब्राह्मण कुलापेक्षा क्षत्रिय कुलाशी अधिक जवळचा संबंध होता. असे असूनही आपल्या पित्याचा क्षत्रियाने वध केला म्हणून परशुरामाने पृथ्वी निःक्षत्रिय केली. महर्षी भृगू वैद्यकशास्त्राचे, ज्योतिषशास्त्राचे, अध्यात्मशास्त्राचे महान अधिकारी असूनही त्यांच्यातील निसर्गप्रेमी कवींचेही आपल्याला त्यांच्या वेदमंत्रातून घडते. अथर्ववेदात त्यांचे सुरेख आपोसूक्त आहे, यातून भृगूंच्या कवित्वाचे प्रत्यंतर येईल. मी त्यांच्या या सूक्ताचा भावानुवाद केला आहे.

यददः संप्रयतीरहावनदता हते । तस्मादा नद्यो ३ नाम स्थ ता वो नामानि सिन्धवः।।अथर्व का.३ सू.१३.१

सदैव गतिशील सरिताजल मेघ बरसता उचंबळले ।

झुळुझुळु झुळुझुळु त्यांच्या नादे नाव उचित "नदी" पडले ।।

यत् प्रेषिता वरुणेनाच्छीभं समवल्गत । तदाप्नोदिन्द्रो वो यतीस्तस्मादापो अनु ष्ठन ।।अथर्व का.३ सू.१३.२

वळसे घेत करि नदिजल नृत्य, प्रेरक त्याचे वरुणदेव

इंद्रही आपलेसे करी तयाला म्हणुनि "आप" पडे नाव अपकामं स्यन्दमाना अवीवरत वो हि कम् । इन्द्रो वः शक्तिभिर्देवीस्तस्माद् वार्नाम वो हितम् ।।अथर्व का. ३ सू.१३.३

देवकार्यास्तव जे सहज प्रवाहित जे जल इंद्राने वरले

इंद्रशक्तीने जे वरिले साक्षात, नाम तया "वारी" पडले

एको वो देवोऽप्यतिष्ठत् स्यन्दमाना यथावशम् । उदानिषुर्महीरिति तस्मादुदकमुच्यते ।।अथर्व का.३ सू.१३.४

श्रेष्ठ देवता तव अधिष्ठाता तू कल्याणकारी प्रवाहिता

"उदक"नामे प्रसिद्ध झाली तव ऊर्ध्वगतीची महानता

आपो भद्रा घृतमिदाप आसन्नगनीषोमौ बिभ्रत्याप इत् ताः ।

तीव्रो रसो मधुपृचामरंगम आ मा प्राणेन सह वर्चसा गमेत् ।।अथर्व का.३ सू.१३.५

ओजभरे हे ऋतधर्मी जल झळके रवीशशीतेजात ।मधुरसाने त्या तृप्त होता जीवनसंग्रमी करू मात ।।

(उत्तरार्ध)

anuradh.klkrn@gmil.com

# मनाची घालमेल



आत्मज्ञान

प्राची परचुरे वैद्य

मन एक अगम्य, गूढ संकल्पना. अजूनही मन म्हणजे काय ते कोणालाच कळले नाही, ज्याचा तळच गाठता येत नाही. मन म्हणजे काय? मनाचे व्यवहार कसे होतात, मनाची रचना खूप अगम्य आहे. मन ही गोष्ट कळण्यापलीकडे आहे म्हणूनच मनाला गूढ असे म्हटले जाते. त्यामुळे तिच्या वेगवेगळ्या अवस्थाही कळण्यापलीकडच्या आहेत. त्यातीलच एक म्हणजे मनाची घालमेल अवस्था.

मनाची घालमेल सुरू झाली की, अनेक विभ्रमांना सुरुवात होते. या विभ्रमांमुळे मनाला इथे थांबू की तिथे थांबू, असे करू की तसे करू असं होऊन जातं. काय करावे, कसे करावे या वेगवेगळ्या द्वंद्वावर मन फिरत राहते आणि क्षणाक्षणाला ते एका विचित्र परिस्थितीत गुरफटत जातं. मन एका विचित्र परिस्थितीतून जात असते. इतरांच्या सांगण्यानुसार जगायचा प्रयत्न केला तरी मध्येच कुठेतरी ते भरकटत जातं. कारण हा त्यांनी केलेला विचार असतो, आपल्या मनाला काय हवे हे आपणच चांगले समजू शकतो. याचं उदाहरण बघायचं ठरवलं तर आपण आपल्याला आवडतो असा एखादा कपडा अथवा ड्रेस घातला असेल पण तो समोरच्याला आवडेलच असे नाही. मग तो साहजिकच म्हणतो की, हा का ड्रेस घातला आहेस, मला नाही आवडला की झाले, लगेच आपण निराश होतो, पण आपल्याला आवडला म्हणून आपण घातला तर मग समोरच्या व्यक्तीची आवड निवड यात आलीच कोठे? पण हा विचारच आपण करीत नाही. मनाची घालमेल व्हायला बरीच कारणं असतात. जसे की, नातेसंबंधात तणाव असेल तर, प्रेमप्रकरणात अडथळे, करिअरमधला तणाव, स्पर्धा, मनातील भावना, विचार, असूया अशी आणि इतर बरीच कारणं आहेत. ज्यामुळे मनाची घालमेल सुरू होते. सुरुवातीला आपण त्याकडे लक्ष देत नाही. उपाय सापडेल काहीतरी असा विचार करून शांत राहतो. पण सुरुवातीलाच त्याकडे लक्ष दिलं तर ती मनाची घालमेल आहे कळतं. ते कळल्यावर आपण त्यावर औषध शोधतोच. माणसाचा स्वभाव आहे ही घालमेल अवस्था आपण दूर करू शकतो. ती दूर करण्यासाठी आपण आपल्या मनातलं बोललं पाहिजे. आपल्या जवळच्या, विश्वासाच्या व्यक्तीजवळ बोललं पाहिजे. पुष्कळदा फक्त बोलूनच ही घालमेल अवस्था संपते. समोरच्याने काही बोलायची पण गरज पडत नाही. कारण पुष्कळदा मनातलं उघड बोलून मनावरचा ताण दूर होतो आणि मनाची घालमेल थांबते. अगदीच कोणी मनासारखे बोलायला नसेल तर आपल्या मनातील भावना लिहून काढाव्या व तेच पुन्हा पुन्हा वाचावे. एखाद वेळेस आपल्याला त्यातून उत्तर मिळण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणे समुपदेशक हा सुद्धा आपल्याला योग्य ते मार्गदर्शन करू शकतो. फक्त आपण त्याच्याकडे जाण्याची व आपले मन मोकळे करून बोलण्याची गरज असते. पण नेहमी आपण आपला अहंकार, समाज काय म्हणेल याची भीती यामुळे गप्प राहतो आणि तिथेच चुकतो. त्यामुळे आपली घालमेल वाढत जाते आणि एक दिवस आक्राळ विक्राळ रूप धारण करते. असं होऊ नये म्हणून मनाला कसतरी होतंय असं जाणवलं की समजावं ही मनाची घालमेल सुरू झाली. त्यावर उपाय करायला हवा.

मन हे बराच काळ आलेल्या ताणाचं विरेचन करत असते. निसर्गानीच त्याला ही क्षमता दिलेली आहे. पण जर मनाच्या सहनशक्तीपलीकडे ताणाचं ओझं वाढलं तर मन तरी काय करणार? त्याची कुरकूर सुरू होते. त्याकडे वेळीच लक्ष द्यायला हवं पण आपण देत नाही. वेळेवारी त्या कुरकुरीकडे लक्ष दिलं तर मनात निर्माण होऊ लागलेल्या नकारात्मक ऊर्जेला आपले हातपाय पसरायला वेळच मिळणार नाही. नकारात्मक ऊर्जेपासून मुक्त असलेलं मन गरुडझेप घेऊ शकतं. सृजनात्मक कार्य करू शकतं. नकारात्मक ऊर्जा मनासाठी केव्हाही घातकच असते. अशावेळी काही मोठ्या लोकांची चरित्रे वाचावी, त्यांना त्यांच्या जीवनात यशस्वी होण्यासाठी मनावरही ताण आला असेल. पण ते सतत सकारात्मक दृष्टीने आपल्या अडथळ्यांकडे बघतात म्हणूनच त्या अडथळ्यातूनही त्यांना मार्ग सापडतो. त्या अडथळ्यांमधून त्यांना सहजपणे वेगळे अनुभव मिळतात. हे अनुभव त्यांचं व्यक्तिमत्त्व आणखी समृद्ध करतात. म्हणूनच मनाला प्रत्येक येणाऱ्या प्रसंगातून सकारात्मक क्षण वेचण्याची सवय लावा. मनाला त्यातून ऊर्जा घ्यायला शिकवा. कोणत्याही प्रसंगात मनाची घालमेल होणार नाही. अडथळे आले तरी तुमचं मन शांतपणे त्यावर विचार करू शकेल. मन जेवढ शांत, कणखर आणि सकारात्मक दृष्टी ठेवणारं असेल तेवढं माणसाचं आयुष्य सरळ सोपं होतं.

# श्री नामदेव महाराज

**शिंपीयाचे कुळीं जन्म मज झाला।**
**परि हेतु गुंतला सदाशिवी ||१|**
**रात्रिमाजि शिवी दिवसामाजि शिवी।**
**आराणूक जीवी नाही माझ्या ॥२॥**
**सुई आणि सातुळी कात्री गज दोरा।**
**मांडिला पसारा सदाशिवं ।।३।।**
**नामा म्हणे शिवी विठोबाचें अंगी।**
**त्याचेनि मी जगीं धन् झालो ।।४।।**





संत महिमा

विलास खानोलकर

दामाशेटी गोणाईची नीट जपणूक करू लागला. त्यांच्या घरात आता नवचैतन्य संचारू लागले होते. परमेश्वर त्यांच्यावर संतुष्ट झाला होता. अखेर योग्य दिवस भरताच गोणाईने एका गोंडस पुत्राला जन्म दिला. दामाशेटी व गोणाई यांच्या आनंदास पारावार राहिला नाही. पुत्रदर्शनाने ती दोघेही हरखून गेली होती. महाप्रयासाने त्यांना हा पुत्र झाला होता. त्यामुळे त्यांचे सुख अवर्णनीय होते. या पुत्राचा जन्म कार्तिक शुद्ध ।।११।। रविवार इ.स. ११९२ या दिवशी सूर्योदयाचे वेळी झाला. त्यावेळी बहुतेक सुयोग होते. योग्य विधिपूर्वक समारंभ करून दामाशेटीने त्या पुत्राचे नाव नामदेव ठेवले.

नामदेवांच्या बाळलीलांमध्ये आईवडील आपले सर्वस्व विसरले पण दामाशेटीचा रोजचा नियम कधीही चुकला नाही. नामदेवांवर लहानपणापासून भगवद्भक्तीस साजेसे असेच संस्कार झाले होते. नामदेव मनाने निर्मळ, वाचेने रसाळ होते. वडिलांचे सोबत ते देवदर्शनास जात असत. त्यामुळे त्यांचीही वृत्ती श्रद्धाळू बनली होती. होता होता नामदेव सहा वर्षांचे झाले. एक दिवस दामाशेटी काही धंद्याच्या निमित्ताने बाहेरगावी गेले होते. त्यामुळे त्या दिवशीची देवपूजा अर्थातच नामदेवांना करावी लागली. देऊळ गावाबाहेर होते. नैवेद्य घेऊन नामदेव घरातून बाहेर पडले तो थेट देवळात गेले. नामदेवांनी देवाची करुणा भाकली.

'देवा, घे रे दूध, नको अंत पाहूस.'

पण छे! देव अगदी दगडी मनाने उभा होता; अखेर नामदेव अगदीच हातघाईवर आले. ते अगदी अखेरचा उपाय म्हणून कळवळून देवाला म्हणाले,

'देवा, आता जर तू दूध प्याला नाहीस, तर मी तुझ्या पायावर डोके आपटीन आणि प्राण देईन.'

इतके बोलून नामदेव देवाच्या पायावर डोके आपटण्याच्या पावित्र्यात उभे राहिले मात्र, त्याच क्षणी प्रत्यक्ष देवालाही कापरे भरले. देव सगुण होऊन पुढे झाला व मुकाट्याने त्याने वाटीतील दूध पिऊन टाकले !! पुन्हा देव आपल्या जाग्यावर स्थानापन्न झाला. नामदेवांना अत्यंत आनंद झाला आणि समाधानाने नामदेवांनी रिकामी वाटी घेतली व घराकडे धूम ठोकली.

नामदेवांनी रिकामीच वाटी आईच्या हातात दिली, त्यांच्या मनात रोजच्या प्रमाणेच देवाने आज नैवेद्य खाल्ला, यात नवीन काहीच नव्हते, त्यामुळे त्यांना हे सर्व सहज वाटले; पण गोणाईने रिकामी वाटी पाहून नामदेवाला विचारले,

'नाम्या, या वाटीतलं दूध कुठंय ?'

'आई, अगं देवाला नैवेद्यासाठी तू दिलं होतस ना? मग ते परत कसे आणायचे ? देवाने दूध पिऊन टाकले !' नामदेव अगदी सहजगत्याच म्हणाले. 'नाम्या, खोटं बोलू नकोस. तू दूध प्यालास का? अगदी खरं सांग.' गोणाईने खोदून विचारले.

'आई, खरंच सांगतो. देव दूध प्याला.'

वडील नामदेवांना घेऊन पुन्हा देवळात गेले, विठ्ठल दूध कसे पितो बघायला.

देवाचा पुन्हा एकदा नाइलाज झाला. त्याने आपले आसन सोडले व मुकाट्याने नैवेद्याचे दूध पिऊन तो जाग्यावर जाऊन उभा राहिला. नामदेव रिकामी वाटी घेऊन घरी परतले. दामाशेटीचा आनंद गगनात मावत नव्हता. नामदेवांनी दगडातला देव सजीव केला. धन्य धन्य तो संत नामदेव.

# आस विठाईच्या दर्शनाची







मनाचा गाभारा

अर्चना सरोदे

वैकुंठाच्या रुक्मिणीवराचा सांगावा कृष्णवर्णीय आषाढघन घेऊन येताच सारी सृष्टी प्रफुल्लित होते. निसर्गाचा हिरवा कुंचला सृष्टीवर फिरताच सृष्टीचे कंच हिरवेगार रूप मनाला मोहवून टाकते. वसुंधरा ही हिरवा शालू लेऊन तयार होते. रंगबेरंगी सुगंधीत फुले उधळणीसाठी आतूर होतात. संपूर्ण सृष्टीच हर्षोल्लासित होते. कारण वर्षभराचा विरह संपणार असतो. रुक्मिणीवरालाही भक्तांना भेटण्याची आस लागलेली असते. वर्षभर डोळ्यांमध्ये विठू माऊलीचं रुपडं साठवून ठेवलेले डोळे आपसुकच पंढरीच्या वाटेकडे लागले जातात. विठाईच्या भेटीची ओढ लेकरांना लागते. "भेटी लागी जीवा लागलीसे आस ! पाहे रात्रंदिवस वाट तुझी" !! जीवाला लागलेली ही आस ही तळमळ आषाढी एकादशीला संपणार आहे. भक्तांची मांदियाळी मृदुंग टाळांच्या गजरात आपल्या माहेरी सावळ्या आईच्या भेटीला पायी निघाली आहे. सोबतीला ज्ञानेश्वर, निवृत्तीनाथ, सोपान, मुक्ताबाई, तुकाराम, नामदेव, जनाई, गोरोबा, चोखोबा या संतांचा मेळा आहेच. अहाहा! काय वर्णावा तो आषाढी एकादशीचा सोहळा. शुभ्र पांढरा पोशाख, डोक्यावर पांढरी टोपी किंवा भगवा फेटा, कपाळी चंदनाचा किंवा बुक्क्याचा टिळा, गळ्यात तुळशीच्या माळा, हातात टाळ किंवा भगवा ध्वज, स्त्रियांच्या डोक्यावर तुळशी वृंदावन अशा थाटात वारकरी मृदुंग टाळांच्या घोषात हरिनामाचा गजर करीत आपल्या विठुरायाच्या भेटीच्या ओढीने आसुसलेल्या पावलांनी पायी निघालेत. अभंग, भारुड, भजन करीत ही वारी पंढरीला आषाढी एकादशीला पोहोचेल. सर्व संतांच्या पालख्याही आपापल्या गावाहून निघाल्या आहेत.

वारीमध्ये 'रिंगण' सोहळा देखील पालखी बरोबर पार पाडला जातो. एखाद्या मोकळ्या मैदानाच्या जागी भक्तगण गोळा होतात आणि वर्तुळाकार रिंगण तयार केले जाते. रिंगणात रांगोळ्यांच्या पायघड्या घातल्या जातात. मानाचे दोन प्रशिक्षित अश्व असतात. एका अश्वावर कुणीच आरूढ होत नसते. त्याला 'माऊलीचा' अश्व म्हणतात. दुसऱ्या अश्वावर एक घोडेस्वार आरूढ होतो. माऊलीचा अश्व पळत येऊन रथात असलेल्या ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांना मान टेकवून नमस्कार करतो, रथाला प्रदक्षिणा घालतो. हा क्षण पाहण्यासाठी लाखो वारकरी डोळ्यांत प्राण आणून वाट पाहत असतात. नंतर वारकरी त्या रिंगणात उतरून झिम्मा-फुगडी, विविध प्रकारच्या उड्या, लेझिम, भारुडे असे सामुदायिक खेळ खेळतात. एकादशीच्या दिवशी सर्व भक्तगण पंढरपुरात दाखल होतील. चंद्रभागेचे वाळवंट भक्तांनी फुलून येईल आणि अवघी पंढरी विठ्ठल नामाने दुमदुमून जाईल. 'याचि देही, याचि डोळा' साश्रुनयनांनी विठू माऊलीचे दर्शन घेऊन कृतकृत्य होऊन पुन्हा पुढच्या वर्षीच्या आषाढी एकादशीला भेटण्याचे गाऱ्हाणे सावळ्या आईला घालून वारकरी परतीच्या प्रवासाला लागेल. इकडे लेकूरवाळा सावळा देव ही आपल्या लेकरांच्या भक्तीत रममाण होऊन त्यांच्यावर आशीर्वादाच्या फुलांची उधळण करेल आणि पुन्हा कटीवर हात ठेवून आपल्या रुक्मिणी सोबत विटेवर उभा राहील. भक्त आणि भक्तिचा हा नादमय सोहळा भक्तिरसात न्हाऊन निघेल. धन्य आमुची भारत माता आणि धन्य आमुची संस्कृती!

# "कर्मगंधा"

**'पूर्वकर्मसमुद्भूतं प्रारब्धं निश्चितं हि तत्।**
**दैवयोगसमायुक्तं सौभाग्यं तु अपराजितम्॥**
**कर्मणा जायते मुक्तिः, कर्मणा बन्धनं पुनः।**
**वर्तमाने तु यत्नेन नियते जीविते गतिः॥'**



ऋतुराज

ऋतुजा केळकर

लिहिता लिहिता माझ्या लक्षात आले, प्रारब्ध हे पूर्वकर्मांपासून निर्माण होत असून ते निश्चित आणि अटळ असते, पण नशीब हे देवाच्या कृपेने उमलणारे एक अद्भुत फूल आहे. जे न मागता लाभते, अचूक ओळखता येत नाही आणि ज्यावर कोणाचंही नियंत्रण चालत नाही. ते अपराजय आहे. कारण त्याच्या वाटा अदृश्य असतात आणि अकल्पनीय आहे. कारण त्याची योजना दैवी असते. कर्मच मानवाच्या आयुष्याचं मूळ बीज आहे आणि जेव्हा ते सजगतेने केले जातात, तेव्हा मुक्तीच्या वाटा खुलतात पण जेव्हा ते अज्ञानाने झपाटलेलं असतं तेव्हा बंधनांची साखळी निर्माण होते. म्हणून वर्तमानातील प्रत्येक प्रयत्न हा आपल्या भविष्याच्या दिशेला आकार देणारा एक दीपस्तंभ ठरतो. म्हणून वर्तमानातील प्रयत्न हेच जीवनाच्या प्रवासाची दिशा ठरवतात.

नशीब म्हणजे आकाशातून अचानक पडलेली एखादी चांदणी जी न मागता, न वाट पाहता आपल्या आयुष्यात चमकून जाते. जणू काही विधात्याने एका क्षणात आपल्या वाट्याला एखादी सुंदर गोष्ट लिहून दिली. नशीब हे समुद्रावर अचानक उगवणाऱ्या इंद्रधनूसारखं क्षणिक पण मनाला भिडणारं.

प्रारब्ध हे मात्र एखाद्या खोल नदीसारखं आहे. शांत, स्थिर आणि आपल्या कर्माच्या पर्वतातून वाहत आलेलं. जसं बी रोवलं जातं, तसंच झाड उगवतं तसचं प्रारब्ध हे आपल्या पेरलेल्या कर्मांचंच पीक आहे. त्याच्या फळाला टाळणं कठीण, पण त्यातून शिकणं मात्र आपल्या हातात आहे. एकीकडे नशीब हे जसं लॉटरीत लागलेल्या भाग्याचं बक्षीस आहे, तसंच प्रारब्ध हे आपल्या स्वतःच्या कर्मांवर उगम पावलेलं नियतीचं आरसपानी प्रतिबिंब आहे.

कित्येकदा संतांनी देखील म्हटले आहे की, प्रारब्ध हे पूर्वसंचित असलं, तरीही वर्तमान कर्म हे आपल्याला त्यावर मात करण्यास संधी देतं. नशीब जर दैवाचं कृत्य असेल, तर प्रारब्ध हे मनुष्याच्या आत्मशोधाच्या प्रवासातील एक मार्गदर्शक दीप आहे किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे झालं तर प्रारब्ध हे आत्मशोधाच्या यज्ञात जीवनाला दिशा देणारा दैवी संकेत आहे.

म्हणूनच आध्यात्मिक दृष्टिकोनातून खऱ्या अर्थाने प्रगल्भ होणं म्हणजे नशीब व प्रारब्ध या जीवनवृक्षाच्या दोन अदृश मुळांचा साक्षेपी अभ्यास करणे-ज्यांच्या पसरत्या छायेखाली आत्मशोधाचा अंकुर शांतपणे फुलतो किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचं तर खऱ्या अध्यात्मिक प्रगल्भतेचा अर्थ म्हणजे नशीब आणि प्रारब्ध या दोन गूढ धाग्यांचा सूक्ष्मपणे मागोवा घेऊन, त्या विणलेल्या जीवनपटात स्वतःचा खरा प्रकाश शोधणे आणि त्यांच्या छायेत न हरवता आपल्या जीवन नौकेचा दूरदूर प्रवास स्वतःच्या विवेकाच्या पतंगाने मार्गी लावणं होय.




# पापाला कुठून सुरुवात होते?



शरीराची सर्व व्यवस्था दिव्य आहे. आपला श्वासोच्छ्वास चाललेला आहे. आपले पाहणे, ऐकणे, बोलणे, आपले विचार ते ही चाललेले आहेत. तुम्ही म्हणाल मी विचार बंद करून टाकेन तर असे होते का? तुम्ही जेवढे थांबविण्याचा प्रयत्न कराल तेवढे ते अधिक येतील. विचाररहित होणे ही एक कल्पनाच आहे. माणूस विचाररहित होऊच शकत नाही. मनुष्य विचाराशिवाय असूच शकत नाही. गाढ झोपेतही तसे होत नाही. कारण स्वप्ने पडतातच ना. गाढ झोपेत स्वप्ने पडत नाही असे म्हटले तर श्वासोच्छ्वास रक्ताभिसरण हे सर्व चाललेले असते ते कोण करते? ते परमेश्वरच करत असतो. आपण व्यवहारात जे काही करतो ते सुद्धा सर्व काही तोच करत असतो तरी आपण मी करतो असे म्हणतो. परमेश्वराला खरे आपण विसरतो ते इथे विसरतो. आत हृदय, फुफ्फुसे, यकृत, किडनी हे सर्व जे चाललेले आहे ते तोच करत असतो. ही व्यवस्था आहे. विचार, चिंतनसुद्धा तोच करतो पण आपण म्हणतो मी करतो. म्हणजे ए टू झेड तोच करतो. आपण काय म्हणतो? मी करतो. पापाला इथून सुरुवात होते म्हणून जीवनांत ताप आहे. जगांत आज सर्वत्र दुःख आहे. " सुख पाहता जवापाडे दुःख पर्वताएवढे'' हे तुकाराम महाराजांनी सांगून ठेवलेले आहे. अरे पण का? "न संसाराच्या अंगी परम दुःख, संसारी मानी सुख तो परम मूर्ख असे'' असे एके ठिकाणी म्हटलेले आहे. पण जीवनविद्येला हे मान्य नाही. सांगायचा मुद्दा हा की संसारही तोच करतो. पापाला कुठून सुरुवात होते? मी करतो असे म्हणतो तेव्हा पापाला सुरुवात होते. सर्व काही तोच करतो असे म्हणा तुमच्या पुण्याला सुरुवात होईल.



जीवन संगीत

सद्गुरू वामनराव पै

**"ज्याचे नांव घेसी तोची तू आहेसी शोधूनी पाही आपणासी शोधिता शोधिता पाही मीपणाचे मूळ बरे''**

मीपणाचे मूळ पाहा असे म्हटलेले आहे. जीवनांत ताप का आहे? मी करतो मी करतो म्हणतो तेव्हा तापाला सुरुवात होते. मी करतो म्हटले की, मी तू मी तू हे आले. जगांत सगळीकडे हेच चालते. मी श्रेष्ठ तू कस्पटासमान. मी आहे म्हणून तुझे सर्व चाललेले आहे. मी पणा तुमच्या ठिकाणी आहे ह्याचा अर्थ तुम्ही देवाला विसरलात.



# ज्ञानेश्वर पब्लिक स्कुलचा





## हरामखोर विजय पवार फरार; पकडण्यासाठी पोलिसांची तीन पथके रवाना

पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड:शहरातील प्रसिद्ध समजल्या जाणाऱ्या उमाकिरण शैक्षणिक संकुलातील दोन खाजगी शिक्षकां-वर बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (पोक्सो) अंत-र्गत गुन्हा दाखल झाल्याने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. या प्रकारामुळे शिक्षण संस्था-ंवरील विश्वासाला तडा गेला आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात अस-लेल्या उमाकिरण संकुलात विविध प्रकारचे क्लासेस चालतात. येथे हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असतात. याच ठिकाणी शिकणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थिनी-ने केलेल्या तक्रारीनुसार, विजय पवार व प्रशांत खटावकर या दोघांनी तिच्यावर जून २०२४ ते मे २०२५ या कालावधीत विनयभंग व लैंगिक अत्याचार केल्याचे स्पष्ट झाले आहे. या तक्रारीवरून बीड येथील शिव-ाजीनगर पोलीस ठाण्यात दोघ-ांविरुद्ध पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असून, शिक्षण संस्थांतील सुर-क्षेविषयी मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष बाब म्हणजे, आर-ोपी विजय पवार हा उमाकिरण कोचिंग क्लासेसमध्ये शिक्षक असल्यासोबतच, राजकीय क्षेत्रा-तही सक्रीय आहे. त्याचप्रमाणे, तो संत ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल या शाळेचा संस्थाचालक देखील आहे. त्यामुळे हा प्रकार समोर आल्यानं-तर शिक्षण व राजकीय क्षेत्रातही अस्वस्थता निर्माण झाली आहे.

### काय आहे प्रकरण?

तक्रारदार अल्पवयीन विद्यार्थिनीच्या आरोपानुसार, विजय पवार व प्रशांत खटावकर यांनी जून २०२४ ते मे २०२५ या काळात विन-यभंग व अत्याचार केला.दोघेही शिक्षक उमाकिरण कोचिंग क्लासेस येथे शिकवतात.(बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा)अंतर्गत गुन्हा दाखल.शिवाजीनगर पोलीसांनी चौकशी सुरू केली आहे.

### पवारचा राजकीय व शैक्षणिक वावर

आरोपी विजय पवार केवळ कोचिंगच नव्हे, तर राजकीय क्षेत्रातही सक्रिय.तो संत ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल या संस-्थेचा संस्थाचालक.अशा पदांवर असलेला व्यक्ती शिक्षणाचा किल्ला ढासळवतोय, असा संताप पालकांमध्ये व्यक्त होत आहे.

### प्रशासनाने त्वरित कठोर...

शहरात अशा शैक्षणिक संस्थांवर पालकांचा विश्वास डळमळीत होत असून, प्रशासनाने त्वरित कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे. दरम्यान या घटनेमुळे शैक्षणिक क्षेत्राला गालबोट लागले आहे.

**उमाकिरण सील करा सीसीटीव्ही ताब्यात घ्या:महिला आयोग**

**आज सर्वपक्षीय,संघटनांकडून बीड बंदचे आवाहन**

**विजय पवारचे धागे-दोरे खोलपर्यंत आहेत?**

**ज्ञानेश्वर पब्लिक स्कुलचे ऑफिसही सील करण्याची मागणी**

**पॉर्न फ्लिम बनविल्याची भीती; या दिनेशने चौकशीची मागणी !**

# बालविवाह प्रतिबंध जनजागृती

## नियोजन:कोठारी विद्यालयात उपक्रम

पुण्यभुमी प्रतिनिधी
कडा:येथील अमोलक जैन शिक्षण संस्थेच्या मोतीलाल कोठारी विद्यालयात बालविवाह प्रतिबंधक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कडा येथील मोतीलाल कोठारी विद्यालयात बालविवाह प्रतिबंध जनजागृतीसाठी पालकांसह विद्यार्थ्यांचे खेळ घेण्यात आले. मुला मुलींना एकत्र बसून त्यांच्यामध्ये बालकांचे हक्क कर्तव्य तसेच वयात आलेल्या मुलांना समजून घेण्यासाठी पालकांची भूमिका काय असावी याबाबत मार्गद-र्शन करण्यात आले. अंबाज-ोगाई येथील मनस्विनी विकास सेवाभावी संस्थेच्या वतीने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संस्थेच्या स्वयंसेवकांनी गाणे खेळ आणि गप्पा यांच्या माध्यमातून विद्या-र्थी आणि पालकांना समजा-वून सांगितले. या कार्यशाळेत विद्यालयाचे मुख्याध्यापक एम ई शिकारे , स्वयंसेविका श्रीमती केदारी, श्रीमती गायकवाड यांच्यासह पालक आणि शिक्षक सहभागी झाले.



# हनुमान पाणी वापर संस्था निवडणूक

## निर्णय:किरण बनकर चेअरमनपदी बिनविरोध



पुण्यभुमी प्रतिनिधी
राहुरी:तालुक्यातील पूर्व भागा-तील प्रतिष्ठित समजले जाणारे हनुमान पाणी वापर संस्थेच्या चेअरमन पदी वळण येथील युवा कार्यकर्ते किरण सुभा-षराव बनकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली हनुमान पाणी वापर संस्थेचे मावळ-ते चेअरमन बापुसाहेब काळे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झाल्या नंतर निवड प्रक्रिया राबविण्यात आली किरण बनकर यांचा एकमात्र अर्ज प्राप्त झाल्याने संस्थेचे सचिव विजय शेळके यांनी त्यांची चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली करण बनकर यांची संस्थेच्या चेअरमन पदी निवड बदल कुषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभाप-ती बाळासाहेब खुळे राहुरी सहकारी साखर कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर खुळे शिव-सेनेचे युवा नेते राजुभाऊ शेटे कुषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती दत्तात्रय खुळे आदींनी त्यांचे अभिनंदन केले सर्वांना सोबत घेऊन संस्थे-चे काम करण्यात येईल सर्वांचे सहकार्यीने हनुमान पाणी वापर संस्था प्रगतीपथावर नेऊन असे प्रतिपादन बनकर यांनी केले.

# पत्रकारास माथेफिरुची धमकी

## खळबळ:सुरेश मोरेंना जीवे मारण्याची धमकी

पुण्यभूमी प्रतिनिधी
लोणार:प्रत्येक पत्रकार हा निस्वार्थ पणे समाजातील चां-गल्या वाईट समस्या जगाच्या पटलावर मांडण्याचा प्रयत्न करीत असतो. कधी कधी तर आपला जीव धोक्यात घा-लून काही समस्या जगाच्या समोर निर्भीडपणे आपल्या जीवाची पर्वा नकरता काही विषय मांडण्याचा प्रयत्न करीत असतो. चांगल्या वा-ईट प्रवृत्तीच्या लोकांचा रोष पत्कारून विषय हाताळावे ला-गतात .अशा अनेक विषयामुळे पत्रकारांचा सत्कार सुद्धा केला जातो. पत्रकार हा समाजाचा आरसा समजला जातो. परंतु दिनांक२४/६/२०२५रोज मंगळवार ला ६ वाजे दरम्यान सायंकाळीएका माथेफिरू, भांडण झगडा काढण्याचा छंद असलेल्या व्यक्तिने दारूच्या नसेत सुरेश मोरे रस्त्याने जात असतांना अश्लील शिवीगाळ



केली. नंतर आपल्या मामे भावाच्या घरी चहा पित असताना सुरेश मोरे यांना घराबाहेर बोलावून लोट पाट जिवे मारण्याची धमकी दिली व मला अपमानित केले. नंतर सुरेश मोरे रात्री ८ वाजता आपल्या मोटर सायकल वरून जालना रोडने जात असतांना दारूच्या नशेत याच व्यक्तीने मोटरसायकलने पाठलाग करून आडविले व अश्लील शिवीगळ केली थांब तुझे हा-तपाय तोडुन जीवच मारत-ो परंतु प्रसंग ओळखून सुरेश मोरे यांनी काढता पाय घेत तेथून आपली मोटर सायकल वापस घेऊन घरी आले नंतर पुन्हा बस स्टँडवर जात असताना रोडवर मोटरसायकल आडवी लावून सुरेश मोरे यांना अडविण्याचा प्रयत्न केला परंतु आपली मोटरसायकल बाजूने घेऊन थेट मेहकर पो-लीस स्टेशनला जाऊन त्या व्यक्तीविरुद्ध फिर्याद दाखल केली अशा गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या गुंड प्रवृत्तीच्या ,गावात दादागिरी करणाऱ्या व्यक्तीवर पत्रकार **पान दोन...**

# संभाजीनगर ठाण्याचा सोपविला चार्ज

## सत्कार:पीएसआय आर.जाधव झाले रुजू



पुण्यभूमी प्रतिनिधी
परळी:जिल्हा पोलीस अधी-क्षक नवनीत कावात यांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात पोलीस दलामध्ये स्थित्यंतरे घडून बदल्या झाल्या, त्याअंतर्गत परळी शहरातील संभाजीनगर पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक आर. एस. जाधव यांनी नुकतीच पदभार स्विकारला आहे. पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांच्या हस्ते व पत्रकार बांधवांच्या हस्ते आर. एस. जाधव यांचे औपचारिक स्वागत करण्यात आले व त्यांना संविधानाची प्रत भेट देण्यात आली. यावेळी पुण्यनगरीचे जेष्ठ पत्रकार धनंजय आरबुने, फुले शाहू आंबेडकरी अभ्यासक भगवान साकसमुद्रे,अतुल्य महाराष्ट्राचे नितीन ढाकणे यांची यावेळी उपस्थिती होती.

# नागनाथ दहिफळेंना पीएचडी पदवी प्रदान

**बाल आरोग्यावर वनस्पती-आधारित संशोधनाला मान्यत**



पुण्यभूमी प्रतिनिधी
परळी:प्रा. नागनाथ केशवराव दहिफळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मरा-ठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीन-गर येथून वनस्पतीशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या संशोधनाचा विषय होता. बीड जिल्ह्यात बाल आरोग्यसेवेसाठी वनस्पती-आधारित पारंपरिक उपायांचा अभ्यास. हे संशोधन डॉ. सविता सुक-ते यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले. ग्रामीण वैद्यकीय वारशाला प्रा. दहिफळे यांनी पारंपरिक ज्ञानाच्या आधारे बाल आरोग्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्थानिक औषधी वनस्पतींचा सखोल अभ्यास केला. त्यांच्या संशोधनामुळे स्थानिक उपचार पद्धतींच्या शास्त्रीय पुनर्मूल्यांकनाला मदत मिळेल. सध्या ते वैजनाथ महाविद्यालय, परळी येथे कनिष्ठ व वरिष्ठ वर्गांना वन-स्पतीशास्त्र विषय शिकवत आहेत. त्याचबरोबर, व्हिजन क्लासेसमध्ये देखील जीवशास्त्र विषयाचे अध्यापन करत असल्याने, विद्यार्थ्यांमध्ये ते विशेष लोकप्रिय आहेत. अभ्यास अध्यापन व संशोधन या माध्यमातून प्रा. दहिफळे यांनी के-लेले कार्य हे नवीन संशोध-कांसाठी प्रेरणादायी आहे.




# आदित्य महाविद्यालयामुळे जीवनाचे सोने झाले

**सक्सेस:** दोन विद्यार्थी एसबीआय बँकेत असोसिएटपदी

पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड:शिक्षणाच्या क्षेत्रात ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण मार्गद-र्शन आणि उज्ज्वल भविष्य घडविण्याच्या उद्देशानेआदित्य कृषी महाविद्यालयात नाविन्यपूर्व शिक्षण दिले जाते. महाविद्या-लयात विद्यार्थ्यांकडून स्पर्धा परिक्षेची तयारी करून घेतली जाते. यामुळे अनेक विद्यार्थी स्पर्धा परिक्षा देवून यश मिळवत आहेत. महाविद्यालयाचे विद्या-र्थी राजप्रकाश वक्ते आणि सौरभ डोमळ यांची स्टेट बँक ऑफ इंडिया (ड्ढख) मध्ये ज्युनिअर असोसिएट या पदावर राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षेतून निवड झाली आहे.राजप्रकाश आणि सौरभ या दोघांनी २०१९ ते २०२३ या कालावधीत आदित्य कृषी महाविद्यालयात आपले पदवी शिक्षण पूर्ण केले. संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभा-षचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, वसंतराव ना-ईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी परिषद सदस्या व आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गद-र्शनाखाली येथील विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर केवळ अभ्यासच नव्हे तर महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सत्रे, तज्ज्ञ-ांचे व्याख्यान, कलागुणांना वाव देणारे विविध कार्यक्रम अयोजित केले जात आ-हेत. या कार्यक्रमात राजप्रकाश आणि सौरभ या दोघांनी सक्रिय सहभाग घेतला होता. त्याच्या या सहभागामुळे आज तो हे यश संपादन करू शकला आहे. या यशाबद्दल डॉ. सातपुते डी.बी., डॉ. प्रसाद खेडकर, डॉ. निर्मला ठोके, प्रा. मिसाळ व्ही.एस., प्रा. गव्हाणे पी.आर. यांनी राजप्रकाश आणि सौरभ यांचे अभिनंदन केले.यशानंतर आदित्य कृ-षी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. श्याम भुतडा म्हणाले, गोरगरीब पार्श्वभूमीतून आलेला विद्या-र्थी शासकीय सेवेत अधिकारी म्हणून पुढे जातो, हे आमच्यास-ाठी अत्यंत समाधानाची बाब आहे. आमच्या महाविद्यालयाचे ध्येय हेच आहे-यशस्वी, सुसंस्कारित,सर्वांगीण विकास झालेला **पान दोन.**


राजप्रकाश वक्ते


सौरभ डोमळे

महाविद्यालयातील स्पर्धा परिक्षेमुळे मी अधिकारी झालो असून आदित्य कृषी महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर प्रथम वर्षापासूनच मी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सत्रे, तज्ज्ञांचे व्याख्यान आणि आमच्या कलागुणांना वाव देणार्या प्रत्येक कार्यक्रमात सक्रीय सहभाग घेतला. येथील प्राध्यापकांच्या मिळा-लेल्या मार्गदर्शनामुळेच आज मी बँकींग क्षेत्रात यशस्वी झालो
**-सौरभ डोमळ**

# लोकांना चुना लावणाऱ्या महेबूब मलिकचा जामीन?

**ॲड.शेख इमरान खाजांचा युक्तिवाद**

पुण्यभूमी प्रतिनिधी
बीड: फ्लॅट, दोन चाकी, चार चाकी वाहन असे आमिष दाखवून लकी ड्रॉ च्या नाव-ाखाली बीडमध्ये सर्वसामान्य नागरिकांना लुटणार्या अरेबियन ज्वेलर्सचा मालक महेबूब मलिक यास लाखोंची फसवणूक केल्या प्रकरणी अटकपुर्व जामीन नामंजूर करण्यात आला आहे. याबाबत माहिती अशी की, बीडमध्ये अरेबियन ज्वेलर्स या नावाने सोन्याची दुकान आहे व त्यास महबूब मलिक हा नावाचा व्यक्ती चालव-तो. त्याने बीड येथे दुकान चालवत असताना सोन्याची व गाडीची लकी ड्रॉ स्कीम चालवली व बीड शहरातील अनेक सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या मोठ्या बक्षिसांचे अमित दाखवून लकी ड्रॉ च्या नावाखाली अरेबियन ज्वेलर्स च्या मालकाने कोट्यावधी रुपये उकळले. व त्यानंतर मागील दोन महिन्यापासून त्याच्या दुकानाचे शटर बंद आहे. शहरातील एक ज्वेलर्स दुकानातून अरेबियन ज्वेलर्स चा मालकाने दिनांक २९. ५. २०२४ रोजी २३ लाख रुपये किमतीचे सोने ग्राहकाला दाखवण्यासाठी नेले याविषयी तक्रारदाराने वारंवार पैसे द्या किंवा सोने परत करा अशी मागणी आरोपीला केली परंतु त्यावेळी त्याने उडवा उडवी चे उत्तरे देऊन फसवणूक केली अशी तक्रार ज्वेलर्स मालकाने(तक्रारदाराने) पोलिसात दिले या प्रकरणी महेबूब मलिक याच्याविरुद्ध कलम ४२०, ४०६ भादवी प्रमाणे शहर पोलीस स्टेशन ला गुन्हा क्र.९३/२०२५ नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्यात आरोपी अरेबियन ज्वेलर्स चा मालक महबूब मलिक याने सत्र न्यायालय, **पान दोन...**